पवार, विश्वासराव, घराण्याचा
ऐतिहासिक कागद-संग्रह

संपादक
मा. वि. गुजर बी. ए.

पवार, विश्वासराव, घराण्याचा
ऐतिहासिक कागद-संग्रह

संपादक

मा. वि. गुजर, बी. ए.,

अध्यापक,

श्रीशिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल, पुणें ५

सन १९४६ इ.

किंमत २ रुपये

आवृत्ति पहिली

प्रकाशक

मा. वि. गुजर, बी. ए.,

४२२, शिवाजीनगर, पुणें ५

मुद्रक

कृ. गं. कवचाळे,

सुपरिंटेंडेंट,

स्टेट प्रिंटिंग प्रेस, देवास सीनियर

प्रस्तावना

प्रस्तुत साधन ग्रंथांत प्रकाशिलेले कागद अहमदनगर जिल्ह्यांतील सुपें गांवीं स्थायिक झालेल्या पवार, विश्वासराव, घराण्यांतील आहेत. ह्याच पवार घराण्याच्या दोन प्रमुख शाखा आज संस्थान देवास व संस्थान धार येथें राज्य करीत आहेत. पवार, विश्वासराव, घराण्याचे विद्यमान वंशज श्रीमंत जगदेवराव भाऊसाहेब महाराज पवार, विश्वासराव, सेनाधुरंधर ह्यांनीं आपलें विश्वासराई घराण्याचें दप्तर मला दाखविलें, तेव्हां त्यांतील सुमारें चारपांच हजार कागद तपासून हे ऐतिहासिक कागद मी निवडून घेतले. आतापर्यंत संशोधन करून प्रकाशित झालेल्या व प्रस्तुत साधन ग्रंथांत प्रकाशिलेल्या कागदपत्रांचें संकलन करून मी ह्या पवार, विश्वासराव, घराण्याचा जो संक्षिप्त इतिहास लिहिला तो ह्या ऐतिहासिक कागद संग्रहाचे प्रारंभीं छापला आहे. तरी पण प्रस्तुत साधन ग्रंथांतील कागदांची थोडी माहिती येथें देणें आवश्यक आहे.

ह्यांतील बहुतेक कागद इनाम, वतन, सरंजाम, कर्ज, राज्यकारभार, महजर, निवाडे यासंबंधीं आहेत. असें जरी आहे तरी त्यांतून राजकीय घडामोडींसंबंधीं अल्प कां होईना माहिती मिळते. त्याशिवाय राजकीय घडामोडींची भूमिका विशद करून सांगण्यास हे कागद उपयोगी पडत असल्यामुळें त्यांचें महत्व वाटतें. आतां राजकीय महत्व असलेल्या कागदपत्रांचें विवरण करूं.

लेखांक ७, ८, ९, ११ व १३ ह्यांमध्यें मुख्य गोष्ट नजरेस येते ती ही कीं, इ. स. १७२५ पूर्वीं पवारांना गुजरात प्रांतांत फौजेच्या बेगमीसाठीं महाल होते आणि त्यांची वांटणी पवार घराण्यांतील काळोजी, संभाजी व मलोजी ह्यांच्यामध्यें प्रथम व त्यानंतर धीराजी, कृष्णाजी व

मलोजी ह्यांच्यामध्यें झाली होती. इ. स. १७२५ मध्यें उदाजीराव पवार पेशव्यांच्या वतीनें गुजरातेंत मुलुखगिरीस गेले तेव्हां त्यांनीं पवारांचे गुजरातेंतील ह्या महालांत दखलगिरी करूं नये म्हणून छत्रपति शाहू महाराजांचें आज्ञापत्र आहे. लेखांक ३० मध्यें बुबाजी पवार, विश्वासराव, व उदाजीराव ह्यांच्यामध्यें गोविंद खंडेराव चिटणीस ह्यांच्या विद्यमानें झालेला तहनामा दिलेला आहे.

लेखांक ६४, ६५, ६७, ६८ व ७१ मध्यें इ. स. १७५३ ते १७५५ व इ. स. १७५७ ह्या सालांतील कर्नाटक स्वाऱ्यासंबंधीं माधवराव पवार, विश्वासराव, ह्यांचे हिशेब आहेत. त्यांत महादाजी अंबाजी पुरंदरे ह्या थोर व्यक्तीचा उल्लेख आहे.

लेखांक ६६ मध्यें माधवराव पवार, विश्वासराव, ह्यांनीं इ. स. १७५३ पासून १६ वर्षें ज्या स्वाऱ्या केल्या त्यांचे उल्लेख असून त्या त्या स्वाऱ्यांतील बाबूजी नाईक बारामतीकर, महिपतराव चिटणीस, विसाजी कृष्ण बिनीवाले, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, राघोबादादा, चिंतो विठ्ठल रायरीकर, हैदरअल्ली (म्हैसूर) इत्यादि प्रमुख व्यक्तींचाहि त्यांत उल्लेख आहे.

लेखांक ८४ ८६ व ८९ मध्यें माधवराव पवार, विश्वासराव, उत्तर कोंकण—जव्हार, रामनगर, सुरत—या प्रदेशांतील मोहिमेवर इ. स. १७५८-५९ मध्यें होते त्यासंबंधीं उल्लेख आहे. तसेंच त्रिंबक सदाशिव पुरंदरे व बाबूजी नाईक बारामतीकर ह्या थोर व्यक्तींचाहि त्यांत उल्लेख आहे.

लेखांक ९७, ११६ व ११७ 'अ' मध्यें इ. सन १७५२ ते इ. स. १७७४ पर्यंत माधवराव पवार, विश्वासराव, हें ज्या स्वाऱ्यांत होते त्यांचा उल्लेख आहे.

लेखांक १०३, १०५ व १०६ मध्यें राघोबादादांचें प्रकरण निकालांत काढण्यासाठीं थोरले माधवराव पेशवे ह्यांनीं माधवराव पवारांना जमावासुद्धां बोलाविलें तो उल्लेख आहे.

लेखांक १०८ मध्यें थोरले माधवराव पेशव्यांनीं जानोजी भोसले, नागपूरकर, ह्यांच्यावर इ. स. १७६८ मध्यें मोहिम काढली त्यावेळीं माधवराव पवारांना फौजेसुद्धां वऱ्हाड प्रांतीं येण्याबद्दल कळविल्याचा उल्लेख आहे.

लेखांक ११२ ११२, अ, ११७ व ११९ ते ११९ फ (पत्रें ७) ह्यामध्यें पवाराचा लेकावळा रामजी पवार ह्याची हकीकत दिली आहे, ती अगदींच नवीन आहे. रामजी पवार हा माधवराव पवार, विश्वासराव, ह्यांचीं दोनशें घोडीं घेऊन चाकरीस महादजी शिंदे ह्याजपाशीं गेला व तिकडे वीसपंचवीस वर्षें राहिला. पुढें पाटिलबाबातर्फें तो मेवाडांत कामगिरीवर आहे. रामजीस कांहीं पत्रांतून रामसिंग पवार असें म्हटलें आहे.

लेखांक १२५ मध्यें माधवराव पवार ग्वालेरच्या मोहिमेवर (इ. स. १७८२) होते त्यासंबंधीं हिशेब दिले आहेत.

पूर्वी योजिल्याप्रमाणें पवार, विश्वासराव, घराण्याचा ऐतिहासिक कागद-संग्रह व संक्षिप्त इतिहास प्रसिद्ध करण्याचा योग आज येत आहे ह्याबद्दल आनंद वाटतो. हें कार्य करण्यांत माझे मित्र व संस्थान देवास थोरल्या पातीचे इतिहासाधिकारी श्रीयुत कृ. गं. कवचाळे ह्यांनीं मला पुष्कळ साह्य केलें त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

शेवटीं आपल्या पराक्रमी पूर्वजांच्या इतिहासाचें साहित्य प्रसिद्ध करण्याचें महत्वाचें कार्य संस्थान देवास थोरल्या पातीचे अधिपति श्रीमंत

कर्नल सर विक्रमसिंहराव महाराज पवार, सेनासप्तसहस्री, के. सी. एस्. आय्, बी. ए., ए. डी. सी. टु हिज मॅजिस्टी धि किंग-एम्परर, ह्यांनीं चालविलें आहे. ह्या महत्वाच्या कामीं महाराजांनीं आपला अखंड आश्रय चालू ठेविला आहे त्याबद्दल मीं महाराजांचे मनःपूर्वक आभार मानतो.

शिवाजीनगर, पुणें
वर्षप्रतिपदा शके १८६८ } मा. वि. गुजर



श्रीमंत जगदेवराव ऊर्फ भाऊसाहेब महाराज पवार,

सी. आय्. ई., 'विश्वासराव', 'सेनाधुरंधर'.

समर्पण

श्रीमंत जगदेवराव ऊर्फ भाऊसाहेब महाराज पवार,

विश्वासराव, सेनाधुरंधर, सी. आय्. ई.,

यांना

त्यांच्या पराक्रमी पूर्वजांसंबंधीं

माहिती देणारा

पवार विश्वासराव घराण्याचा

ऐतिहासिक कागद-संग्रह

हा ग्रंथ

प्रेमादरपूर्वक समर्पण केला असे.

—मा. वि. गुजर

पवार, विश्वासराव, घराण्याचा ऐतिहासिक कागद-संग्रह

लेखांक १ १०-१२-१६७७

महजरनामा ब तारीख २४ माहे सवाल रोज दुसबे सुा समान सन १०८७ सुरत मजलेसी कसबे पारनेर सबब आंकी राजश्री बुबाजी राजे वलद कृस्णाजी राजे पवार मोकदम मौजे सुपे पाा पारनेर यासि विठोजी वलद दसपाटील वाडेकर मोकदम काा वाडे ताा माा साा जुनर लेहोन दिधले यैसे जे आपला गांव तुम्हास सन १०८५ व सन १०८६ मधे जागीर होता. त्यास उगवनीबदल आपला बाप दसपाटील व रामाजी वलद विठोजी देसपाडिया ताा माा हे दोघे आनऊनु कसबे पारनेरी जागीर म्हनऊनु अदबखाना घाल्डन बुलाखी चोपदार चाकर हजुरी महसल ठेविला होता त्यास दसपाटील मजकुरे व रामाजी देसपाडियानें बुलाखी चोपदार आदबखानियांत रात्रीं आदरच्या आदर कोठडीमधें फासी घाल्डन बुलाखी पुरा करून खून केला आनि बुलाखी मजकुराची मता मोहरा ९० नवद होत्या त्या घेऊन आदबखाना फोडून दसपाटील व रामाजी देसपाडिया पलोन गेले. त्यावरी चोपदाराचा वारीस दरबारीं जाऊनु फिर्याद जाला. खूनबाहा * व त्याची मता जे गेली होती ते यैसे सदरहु पैके दरबारी तुम्हास पडिले ते तुम्ही देऊन चोपदाराचा मामिला फारीख केला. त्यावरी साहेबी वाडेकरास तलब पाठविली कीं हजुर येऊन खुनाचा व मतेचा जवाब करने. त्यावरी आपला

* किंमत

बाप दसपाटील व रामाजी देसपांडिया हातीं लागले नाहींत. पलोन गेले. मग आपनास दसपाटीलचा फर्जंद म्हणऊनु तलबें घेऊनु अले. त्यास माहाराजे फर्माविले कीं आपला खून केला आहे व त्याची मता नेली आहे त्याचा जवाब करणें. आपणास दरबारी मबलग पैके पडिले आहेत म्हणऊन फर्माविले. त्यास खूनबाहा पाहता रजपूत मेला त्याचा खूनबाहा सोने मन साडे तीन होते. त्याचे पैके मबलग होताती. जबाब करवले नव जाती म्हणऊनु मेहेरबान होऊनु जो टका साहेबास दरबारी पडिला आहे तो देऊन म्हणऊन रदबदल जालियावरी खूनबाहा रुपये १२४० बारासे चालीस व मता मोहरा ९०८० नऊ (द) दर मोहरेसी रुपये १४ यो रुपये १२६०८० बारासे साठी मोकरा रुपये हजार २५०० अडीच हे आपण बरजाये रकबत खुद कबूल केले. हे पैके दसपाटील व रामाजी देसपांडिये या हर दोजन मुदती महिने तीन मोकरर केली आहे. ते मुदतीस झाडा करतील. जरी मुदतीस झाडा न करितील तरी चाडाची मोकदमी व देसपांडेपण तुम्हास मिरास करूनु दिधली आसे. तीं दोनही वतनें लेकराचे लेकरी आर्जानी करणें. हा महजर सही.

दा। गोविंद जगनाथ आ। देसपांडिये का। पारनेर.
दा। गिरमाजी गोविंद आ। देसपांडिये पा। पारनेर.
दा। आबदूल करीम व सयाजी देसमुख पा। पारनेर.
दा। राघोजी बाबाजी आ। देसमुख पा। पारनेर.
दा। मोकदम व सेटिये व महाजन कसबे पारनेर.
दा। राघोजी नीलकंठ कुलकर्णी का। मा।.
दि। आपाजी कृस्ण चिटिनीस पा। पारनेर.
नि। नागर विठोजी पाटील.

लेखांक २ इ स. १७०४-०५

* चकनामा बा। इनाम कालोजी वलद बुबाजी पोवार मोकदम मौजे सुपे पा। पारणेर सा। जुनर सुा। सन हजार १११४ इनाम बाबती कदीम मोकदमीचा वगैरे चावर एक मोकरा बिघे १२०

बा। मोकदमी कदीम चावर
निम मोकरा बिघे ६०
यासी चक थल

बा। यैवज सेलपाटी चावर
निम मो बिघे ६०
यासी चक थल

पूर्वेस पस्चमेस पूर्वेस पस्चमेस
उतरेस दक्षणेस उतरेस दक्षणेस

सदरहू थल नेमस्त करून चकबंदी केली असे मो सुद

दा। मुकुंद रघुनाथ
आ। सखोजी व त्रिंबकजी
हाडे देसमुख पा।

दा। विठल कान्हो आ।
देसपाडिये पा। मा।

लेखांक ३ तारीख २३-१२-१७१४

श्रीशंकर

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४१ जये नाम
संवछेर मार्गसीर्ष बहुल त्रयोदसी गुरूवासर
क्षेत्रिये कुलावतंस श्री माहाराज राजेश्री

---

* (सदर कागदावर वाटोळा व लंब वर्तुळी असे दोन फारशी शिक्के असून पहिल्यांत "हरकिसन देसपांडे सरकार जुनेर सन १११० जुलूस ४२" हा मजकूर आहे. दुसऱ्या शिक्क्यांत "जवजे त्रिंबक हरी देसपांदिया सरकार जुनेर सन १११३ जुलुस ४५" हा मजकूर आहे.)

छत्रपति स्वामीचे

श्री ।
राजा शाहू नरपति हर्ष
निधान बाळाजी विश्व
नाथ प्रधान

। श्री
श्री आई आदि पुरुष
श्री राजा शाहू छत्र
पति स्वामी कृपा
निधि तस्य परशुराम
त्र्यंबक प्रतिनिधि

सेवेसी आज्ञाधारक नारायेण मजमु—दार सुभा सिदोजी थोरात दिनकरराऊ सुभे लस्कर सेवेसी विज्ञापना. स्वामीनीं कृपालु होऊन राजेश्री तुको नारायेण यासी रो कालोजी पवार याची मजमु सांगोन जमानाविशी आज्ञा केली तरी मा।रनुलेस आपणा हजीर करून हजीर करू न सको तरी त्याचे तालुकातीचा जाब करून. हा जमानकतबा सही.

लेखनालंकार रुजू.

तेरीख ८ जिल्हेज सुा खमस.

सुरू सुद बार.

लेखांक ४ तारीख १३-११-१७१७

श्री

कर्ज विभुतीगीर बा।

कागद आश्विन वद्य नवमी

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्ये राजश्री कालोजी पवार व कृष्णाजी पवार यांसी प्रती तपोनिध विभुदगीर गोसावी मुा। का। नासिक. अनेक आसिर्वाद. उपरी तुह्मापासून स्वार जालो ते आस्विन वदी ९ नवमीस

सुखरूप गांवास पावलो. तुह्मी जे कार्य सांगितल होते ते पाठविले. बिता॥

४८ मोहरा दर रु॥ १२।

२०१८ रोख रु॥

एकूण रु॥ आडिचसे पाठविले आहेत ते घेणे व याज सिवाये सोनाजी सिंपी रोख रु॥ १०० संभर एकूण रु॥ साडेतीनसे तुह्मास पावले कलल पाहिजे. घोडी व मानकु कोठोले ब मार्फती कासी जासूद पावले ते तुह्मी घेणे कलल पाहिजे. बहुत काय लिहणें. वायदेसीर रु॥ पावते करणे. हरिपंतास सत्वर पाठवणे. बहुत काये लिहिणें हे आसिर्वाद.

राजेश्री कालोजी पवार व राजश्री कृष्णाजी पवार यासी दीजे.

रा॥ छ २० जिल्हेज

दा॥ बालगीर गोसावी आसिर्वाद.

लेखांक ५ इ. स. १७१७-१८

श्री

राजश्री कृष्णाजी पवार

सुभेदार गोसावी यांसी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमाने श्वा॥ कृष्णगीर दि॥ विभूतगीर बु॥ लालगीर दि॥ रंजितगीर सोमस्वरगीर दि॥ मानगीर नि॥ नारायण + + घोडीया बा॥ रुपये बितपशील

रुपये	
११७	विभूतगीर बु॥ ता॥ कृस्णगीर
८१	विभूतगीर खु॥ ता॥ कृस्णगीर
१०५॥	रंजितगीर ता॥ लालगीर
५२॥	मानगीर ता॥ सोमस्वरगीर
३५६	

एकूण रुपये ३५६ तीनसे छेपण आपणापासी पावले. हे लिहले सई. मुा खबखेड तापीतीर छ २१ रावल

† गाह

खंडोजी विथापे

+ + + + +

मानाजी पवार

निशाणी तिरसूल



लेखांक ६ इ. स. १७१७–१८

श्री

यादी सो कृष्णाजी पवार बुा समान आसर आलफ बाकी रवा घोडे बुा गोसावी पैकी राहिली त्याचे कागद दिल्हे.

किता खासगत कर्ज दिवाण रुजु धरिले

किा छ १४ रावल खंडोजी मोरे याचा हवाला होता

× × ×

(पाठीमागें)

विभुतगीर खुा निबाजी
सिंदे पैकी रुपये १३७॥
खत आले
विभूतगीर बुा रुा
१०० गायकवाड पो
२५ का कबलात देणे
१२५

† गाह (गवाह) = साक्षीदार,

लेखांक ७ × × × तारीख ४-८-१७२५

नकल × × × × ×

यादी

श्रावण शुध ७ जिल्हेज ६ सुा सीत

धीराजी पवार विश्वासराव यांस केरोजी पवार विश्वासराव यांना गुजराथेंत कांहीं परगण्यांचा असलेला सरंजाम व कसबे नासिकची पाटीलकी देणें ह्मणून आज्ञापत्र. × × × ×

केरोजी पवार याणी वांटणी करून कालोजी संभाजी व मलोजी यांना दिलेला सरंजाम त्यांचेकडे पूर्वप्रों चालविणें ह्मणून आज्ञापत्र.

१ धीराजी पवार.

लेखांक ८ तारीख २६-९-१७२५

छ २९ मोहरम आश्विन शुध
प्रतिपदा रविवासर सुा सीत

धीराजी पवार यास पत्र जे तुह्मासी तुमचे बंधूचे चितशुधी नाहीं सबब कृष्णाजी पवार व मलोजी पवार यांस विश्वासराई सरदारी बराबर चाले तसें वर्तन करणें ह्मणून पेशजी पत्र दिलें त्याप्रों आतां चिटणिसी पत्र.

लेखांक ९ तारीख २--१०--१७२५

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५२ वीश्वा × × अश्विन शुध × ×
× × × × × ×

राजश्री कृष्णाजी पवार × × ×

× × × × ×

रा विस्वासराव पवार याचे सरदारींत चालत होते त्याप्रों चालावे. याचे आज्ञेप्रों वर्तावे यैसी पेसजी आज्ञा केली आहे तेनेप्रमाणें वर्तन स्वामी सेवा करणें. कासाराच्या यैवजाची दामशाही तुह्माकडे बैसेल तेही कबूल × दण. या कामास गोदजी संकपाल व जावा × × × पाठविले × ×

× × × × ×

बार सुरु सुद बार बार बार

लेखांक १० तारीख २४-१०--१७२५

राजमंडल

छ २८ सफर सुा सीत अशरीन

खासुदगी

कालोजी व मानाजी पाटील मौजे सुपे पाा पारनेर येथें पेटेस कौल सात साले माफीचा दिल्हे असे १

बार

लेखांक ११ तारीख ११--११--१७२५

छ १६ रबिलोवल कार्तिक बहुल

प्रतिपदा गुरूवासर सुा सीत

किता पत्रे

कृष्णाजी पवार व मलोजी पवार यासी जे राजश्री केसोजी पवार

विश्वासराव यानीं तुम्हास सरंजाम देऊन चाकरी करीत होते तेणप्रों धीराजी पवार याजबराबर चाकरी करून सरंजाम नेमून देतील हा खाऊन सेवा करीत जाणें आणि तुम्ही त्याजबरोबर चाकरी करीत नाहीं तेव्हां तुमचा सरंजाम दुसऱ्यास देऊन फौज ठेवितील यैसे जाणोन वर्तणूक करणें म्हणून पत्र.

१ कृष्णाजी पवार
२ मलोजी पवार

राजश्री उदाजी पवार यास पत्र जे प्रांत गुजराथ येथें माहाल रा। धीराजी पवार यांसी आहेत ते अमल करतील. तुम्ही त्या माहालांत दखलगिरी न करणें म्हणून पत्र.

१ उदाजी पवार

लेखांक १२ तारीख ४-१२-१७२५

श्री

राजश्री मोकदम मौजे बोपखेल यांसी

.... ची आज्ञा जे राजश्री कृष्णाजी पंवार यानीं तुम्हांकडून रुपये १५ पंधरा देविले आहे ती तुम्हांस पत्र लिहिले आहे ते पाठविले आहे त्याजवरून कळो येईल. हरसिंग पाठविला आहे याजबराबर रुपये पाठवून देणें. आगत्य आहे. आनमान न करितां पाठवून देणें. जाणीजे. मार्गेश्वर शुध येकादशी सके १६४७.

लेखांक १३ तारीख २५-२-१७२६

छ ३ रजब सुा सीत

किता पत्र

धीराजी पवार यास पत्र जे केरोजी पवार यानीं सरंजाम काळोजी पवार, संभाजी पवार व मलोजी पवार यांस वांटणी पत्रे करून दिली त्य प्रों तुम्ही चालविणें त्यास हरकत करण्यास तुम्हास प्रयोजन नाहीं ह्मणून पत्र.

१ धीराजी पवार.

लेखांक १४

श्री

राजमान्य राजेश्री कृष्णाजी पवार विस्वासराव यांसी प्रति सौभाग्यादिसंपन्न उपरी. तुम्हा कारणे संक्रमण प्रयुक्त तीळ शर्करा थैली १ एक पाठविली आहे. घेवून पावल्याचें उतर पाठवणें. जाणीजे. छ ५ रमजान बहुत काय लिहिणें.

मोर्तब सुद *

लेखांक १५

श्री

राजश्री कृष्णाजी पवार विस्वासराव यांसी

आज्ञा केली ऐसी जे मसलतीस राऊत रवाना करावयास पाठवणे ह्मणून

---

* टीप:- शिक्का अष्टकोनी आहे.

स्वामीनीं वरचेवरी आज्ञापत्रें सादर केलीं आहेत व राजश्री आपाजीपंत व नरसीपंत यासमागमेंहि सांगोन पाठविलें आहे. त्याणी तुम्हास सांगितलेंच असेल. ऐशीयास अद्यापि राऊत आले नाहीं याजकरीतां हें आज्ञापत्र सादर केलें आहे, तरी पत्रदर्शनी नेमणुकप्रमाणें राऊत पाठवणे. एक घडीचा उशीर¶ न करणें. या उपरी दिवसगतीवर न घालणें. बहुत काय लिहिने.

लेखांक १६ तारीख २६-१०-१७३४

श्री

राजश्री बाबुराव सखाजी

कमाविसदार माहालानिहाय गो यांसी

छ आखंडित लक्षुमीआलंकृत राजमान्य स्नो मानाजी पवार दंडवत्न. सुा खमस सलासीन मया आलफ. राजश्री बाबुजी रंगनाथ यास प्रा आसेरी येथील मुजमु सांगोन पाठविले आहेत. तरी याचे हाते मुजमूचे प्रयोजन घेत जाणें. यास सालीना वेतन रुपये १०० येकसे केले आहेत. पा मजकुर पैकीं पावणे. जाणीजे. बहुत काय लिहिणें. छ ९ जमादिलाखर

हे विनंती.

श्री राजा शाहू चरणी तत्पर कालोजी सुत कृष्णाजी पवार नीरंतर

मोर्तब सुद

¶ येथून पुढें छत्रपति शाहू महाराजांचें हस्ताक्षर.

लेखांक १७ तारीख १०-१२-१७३४

श्री

भार्गव बावा

राजेश्री बाबुराव सखाजी
कमाविसदार मा। हाय प्रा।
अशर वगैर गो।

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो। कृष्णाजी पवार विस्वासराऊ दंडवत. सुहुर सन खमस सलासीन मया अलफ. तुह्माकडील रसदेचे यैवजी श्रीमंत यांसी रुपये ५०० पांचसे देविले आहेत. पावते करून कबज घेणे तेणेप्रो। मजुरा असेत. छ २४ रजब. हे विनंती

+

श्री राजा शाहू चरणी तत्पर काळोजां सु त कृष्णाजी प वार णीरंतर	मोर्तब सुद

लेखांक १८ तारीख १६-१२-१७३४

श्री

राजश्री बाबुराव सखा-
जी कमादार मा। हाये गो।

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो। कृष्णाजी पवार विस्वासराव दंडवत. सुा। खमस सलासीन अलफ. तुम्हाकडे रसदेचा करार केला होता.

+ पत्राच्या पाठीमागें डावे बाजूस आरंभीं सदर शिक्का आहे.

खत दिल्हे आहे त्यापैकी देविले निा नरसी सामराज. दरबार खर्चास रुपये ६३४ सासे चवतीस देविले आहेत. देणे पा कब्ज घेणे त्याप्रों मिती मजुरा देऊन. छ १ साबान. बहुत काये लिहणें.

श्री राजा शाहू चरणी तत्पर काळोजी सुत कृष्णाजी पवार णीरंतर	मोर्तब सुद

लेखांक १९ तारीख २९-७-१७३५

बुबाजी पोवार विस्वासराऊ
मोकासी पा सेवगाऊ

रोखा राजेश्री .... यासी विस्वासराऊ देसमुख पा मार रोखा लेहून दिधला यैसा जे. सरकारातून देण घेतल मुदल खंडी दोन खंडीयाची निमसवाई प्रमाणे बाजरी २। सवा दोन खंडी देऊन हा रोखा लिहला सही. दाा ३० सन ११४५ छ १९ माहे रावल.

लेखांक २० तारीख २७-९-१७३५

श्री

राजश्री बाबुराऊ
सखाजी कमाविस
दार मा हाये आशर
गोसावी यासी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो मानाजी पवार दंडवत. सुा सीत

सलासैन मया अलफ. खंडो नरसी मजमदार यासी वेतनात रुपये १०० सेभर देविले आहेत. देणे. छ २० जमादिलावल. बहुत काये लिहणे.

मोर्तब
सुद

लेखांक २१

तारीख १०-१-१७३७

नकल

जबानी करारनामा सके १६५८ नळनाम सवछरे पुश वद्य ५ ते दिवसी बुबाजी पोवार पाटील पा मो मौजे सुपे प्रा पारनेर यासी मोकदम देहाये बारा गौऊ बिताल

१ सिऊजी वा बावाजी पा मो मौजे उबरे

१ मोकदम मौजे निंबेदेबोर मा कुसाजी पा

१ सोयेराजी वा देवजी पा खंडोजी वा मोल्याजी पा मा मौजे सिंगवे

१ गिरजोजी पा वा जाऊजी पा बावाजी वा वाकोजी पा मो खडाबा खुर्द

१ मकाजी वा निंबाजी पा मो मौजे दिगरज

१ माहादाजी वा सोनजी पा मो मौजे खडाबा खुर्द

१ रामजी वा कालोजी पा रतोजी वा सेटियाजी पा मो मौजे चिचाले

१ बहिरजी वा गणोजी पा मो मौजे वरवडी

१ सिऊजी वा गोदजी पा मो मौजे बाभुलगांव

१ होणाजी वा भिऊजी पा व बहिरजी वा जिवाजी पा मो मौजे धामोनी

सदरहु गांव देहाये प्रा नांदूर सु॥ सन ११४६ कारणे करारनामा लेहान दिधला ऐसा जे तुह्मी आपणास पुसिले कीं पुरातन पाटील कसबे नांदूरचा कोन आहे त्यासी आपले पूर्वज व कुळस्वामी व गंगा स्मरोन सांगणें त्यासी पुरातन कदीम पाटील मो दरोबस्त का नांदूरची गाऊ याची आहे. आपले पूर्वज व गंगा व कुलस्वामी स्मरोन सांगितलें आहे. यासी लटके होऊ तरी दिवाणचे गुन्हेगार व गोताचे खोटे होऊन. हें लि॥ सही.

नि॥ नांगर

बा॥ गंगाजी राजेश्वर कुलकरणी
मौजे बाभुळगाव

गोही

जाखोजी वा॥ तुळसा	जोगोजी पा॥ वा॥
जी पा॥ मो मौजे	दमाजी मो मौजे
............................बु॥ प्रा॥	........................बु॥

संगमनेर

लेखांक २२ तारीख १८-१-१७३७

श्री

राजश्री मानाजी पवार गोसांवी यांसी

अखंडीत लक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो चिमणाजी बलाल आसिर्वाद. सु॥ सबा सलासैन मया व अलफ. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री श्रीधर गोविंद यांचे ऐवज पैकी रु॥ ३०० तीनसे पाठविले ते

सटवोजी व येसाजी जासूद याचे गुजारतीनें पावले. जाणिजे. छ २७ रमजान बहुत काय लिहणें.

० श्री ‿
राजा शाहू नृप
ति हर्ष निधान बा
जीराव बल्लाल
मुख्य प्रधान

लेखन
सीमा

लेखांक २३ तारीख १४-३-१७३७

श्री

रोखा-सके १६५८ नलनाम सवछरे सिमगा वद नवमी ते दिवसी धनको नाम मातुश्री भिऊबाई पवार यांस रिणको नाम कासी पा मो मौजे पचाल रोखा लेहुन दिधला यैसा जे. आतमसुख परवत समधे घेतले मुा दान २॥।१ दोन खडी सोला मन यास वाढ सवाई परिमान खरीफाच्या फसलाच्या देऊन माप सोलिल २। खडिया देऊन सहादेसी परदेसी देऊन यास अनथा करून तर अपल्ये कुळ स्वोमीची व मातापितीयाची सपत आस. हा रोखा लेहिला सही. बिकलम ३० जिनस बाजरी.

समध गांव निा नांगर

गोही

रोा सुबानजी सादल मौजे रूई

माऊजी ठोंबर मार

वसूल देवपुरी पाठविले खडी २

लेखांक २४ तारीख ४-८-१७३७

श्री

माहराज रा। बुबाजी पोवार विस्वा-
सराऊ मोकासी देहये पा। सेवगाऊ

कर्जरोखा सके १६५९ पिंगल नाम सवत्सरे श्रावण वदी ५ पंचमी ते दिवसीं खत लिखिते धनको नाम \ यासी रिनको नाम चादजी पा। मो व संभाजी पा। मो मौजे अंतरवाड बु॥ आत्मकार्य प्रवतस मधे घेतले मुदल दोन जिनस बाजरी मो खडी २॥ अक्षेरी खंडीया आडीच माप सोळुले हे दिडी प्रमाणें मो खंडीया पावने चार जाले है खरिफावर बिलाऊजुर देऊन. जर मुदतीस न देवूं तर रबीवर दुनीन खंडीया पांच देऊन. हे रोखा लेहून दिधला सही.

नि॥ नांगर
सको विठल आ॥
कुळकर्णी मो भोगुर.

याची उगवनी रा। काऊजी पा। मो व तुकोजी मुडदारे मो भोगूर पा। सेवगाऊ. सु॥ सन ११४७ कारन लेहोन दिधले यैसजे हे मुदतीस दाने न देतील तर अपन खुद निसबत रोखियाप्रमान दाने देऊ. हें लि॥ सही.

गौही

बावलखान जमातदार का। सेवगाऊ

लेखांक २५ तारीख १२-८-१७३८

श्री

महजद

तहनामा सके १६६० कालयुक्त नाम सवत्सरे भादवा सुध ९

ते दिवसीं राजेश्री बुबाजी पवार पा मो का नांदूर प्रा मार यासी वीरजी देसमुख का मार सन ११४८ कारनें तहनामा लेहून दिधला यैसाजे, आपण सत्य स्मरुन महजद स्मरून तह केला आहे कीं नारोजी पा का मार मो खरा त्याचा लेक बालोजी पा मो खरा त्याचा वंसीक सयाजी पा मो हे खर आहे. यांसी सयाजी पा यानीं निमे मोदमी तुम्हास रा कृस्णाजी पवार होते (ते) व्हां दिल्ही. जे घडीस तुम्ही महजर कराल ते घडीस आपन महजरावर नागर करून देऊन विठोजी देसमुख व मु + अतखान देसमुख + + + + + + (दोन ओळी मजकूर फाटला आहे.)

दा कोनेर हरबाजी कुलकर्नी
का मार

गोही

जावजी सुतार का मार — येमाजी कोष्टी का मार
नि किकरे — नि धोटा

कालनाईक बा बुबा
माहर का मार
नि बिला दोर

लेखांक २६ — तारीख ५-७-१७४१

राजश्री बुबाजी पवार
सुबेदार मोकासी

वायदेरोखा सके १६६३ दुर्मतीनाम सवछरे आधिक सुध चेतुर्थी ते दिवसीं राजश्री यासी रामाजी कृस्ण सबनीस व मो मौजे बरखेड

पा सेवगाऊ. सुा ११५१ कारणे वायदेरोखा लेहून दिधला यैसाजे, सके १६१८ मधें आपल्या बापानीं कर्ज दाणे खंडी २ घेतले याचा रोखा आलाहदा रा गोविंदपंत सुबेदार याजपासी आहे. त्यास आपणास तगादा रा गोविंदपंत सुबेदार यानीं केला. त्यास दताजीपंत देशपांडीये गांवास आलियावर दाणे दिल्हे ते मुजरा घेऊन बाकीचा हिशोबु करून वाट करून देऊन. न देऊं तर रोखायाचा हिशोब रा सुबेदारानीं केला खंडी १५ येणेप्रमाणें देऊन हा वायदारोखा लिा सही.

गोही

राघोजी नाईक	भवानी अनंत आा
का मजकूर	कुलकरनी मौजे बोकणी
	शामाजी नागनाथ कुलक
	र्नी का सेवगाऊ

छ १५ माहे राल

लेखांक २७ तारीख १२-१०-१७४३

श्री

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमा
न्ये राजश्री नारोबा बाजी कमाविसदार
प्रो पारनेर गोसावी यांसी

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुा आर्बा आर्बैन मया व अलफ. मौजे सुपे प्रो मजकूर राजश्री बुबाजी पवार विस्वासराव याजकडे

बाबती आहे त्याप्रमाणें करार असे. तरी सुदामत चालिले आहे तेणेप्रमाणें चालवणें. जाणिजे. छ ४ रमजान. आज्ञा प्रमाण.

लेखन
सीमा

लेखांक २८ तारीख २६-१२-१७४३

श्री

तीर्थस्वरूप राजश्री बु

बाजी पवार वडिलाचे शेवेसी

अपल्ये येशवंतराऊ पवार. कृतानेक साष्टांग दंडवत विनंती उपरी. कसबे नासीक येथील मुकदमी समाईक होती त्यास पूर्वीं कितेक दिवस राजश्री धीराजी पवार याणीं केली. त्यापासून अलीकडे राजश्री मलोजी पवार याणी रूधिरोद्धारी सवछेरपरियेंत करीत आले. त्याजवर तुम्ही आपली करावी त्यास आम्हास दिल्ही असे. तरी आपण कांहीं दिवस भोगवटा करून मंग वडिलानीं करावी यामुळें कांहीं कजिया निर्मान जाहाला अगर खर्च वेच पडला तरी तुम्ही व आम्ही मिलोन वारू. या गोस्टीस अंतर किमपी होणार नाहीं. यासी अंतर करू तरी आपल्या पूर्वजांची शफत असे व कुळस्वामीची आण असे. शके १६६५ पौश वद्य सप्तमी छ २० जिल्काद बहुत काय लिहिणें हे विनंती. हस्ताक्षर जिवाजी बापुजी

श्री
भवानी शंकर चर
णी तत्पर आनंद
राव सुत यशवंत
राव पवार नीरं
तर शके १७९२

साक्ष

१ जगदेवराव पवार

१ दारकोजी पवार

लेखांक २९ ३०-१२-१७४३

श्री

राजश्री बहीरजी जाधव

गोसावी यांसी

छ स्नो। बुबाजी पवार विस्वासराऊ. रामराम सुा आर्बा आर्बैन मया अलफ. का। मज्कुरचे पाटीली समधे कागद सुमार ४७ सते तालीस रुमाल २ याचे फेरीस्त सिक्यानसी पाठविले आहे. घेऊन जतन ठेवणें. त्याखेरीज मातुश्री आऊचीं खतें राहिलीं सुमार १९ व येशवंतराव पवार याचा कागद नासिकचे पाटीलकीबा। येसे फेरीस्त दुसरें पाठविलें आहे. हेही कागद जतन ठेवणें. जाणिजे. छ २४ जिल्काद.

मोर्तब
सुद

लेखांक ३० इ. स. १७४३-४४

श्री

तहनामा राजश्री चिरंजीव बुबाजी पवार विस्वासराव यासी उदाजी पवार. सुा आर्बा आर्बैन मया अलफ. राजश्री गोविंदराव चिटणीस याचे विद्यमाने

तह

बि॥

\+ \+ \+

कर्जाचा यैवज व दरबार खर्च वगैरे किरकोलदेखील एकंदर सन आर्बा ता मु-करर जाले रुपये ४००० च्यार हजार यासी वायदे पेस्तर सन खमस आर्बैन

२००० कार्तिक मास

२००० फाल्गुन मास

४०००

सदरहू दो हाफ्तियानी देऊं कलम १

(फाटलें आहे)

२

सन सिता मधे आम्हाकडील सरंजामाच्या बाबती साडे तीन हजारापैकीं तुम्ही दिल्हे रुपये

६०० तीर्थरूप राजश्री संभाजी पवार नाना याजपासून नासिकचे यैवजी बाबतीदारानीं घेतले होते ते तुम्ही नानास फिरून दिल्हे.

५०० खानदेश बाबत

११००

जुने सरदारीची चवथी तक्षीम + + + आहे त्याचा + + जाला कर + + + + वणे सातसे रु॥ + + नेमणूक आह्मी माहालावरी करून दिल्ही ते साल दरसाल घेणें. या खेरीज आलां-डा बलांडामुळें जाजती गैरमोईनी दे + + + ते येथा + + + देऊं + + + + पैकीं + + + + कारकुनाची + +

सदरहु रुपये आकरासे तुम्ही दिल्हे आहेत त्यास आम्ही म्हणतों कीं, साडे तीन हजाराची नेमनूक परभारें माहलावरील करून दिल्ही होती त्याची कबजे आम्ही आस्विन मासीं आणून देवूं म्हणजे अकरासे रुा मागावयास तुम्हास तालुका नाहीं. कबजे अस्विन मासीं सदरहु साडेतीन हजाराची न दाखवूं तरी आकरासे रुपये कार्तिक मासीं सन खमस अर्बैनात बिन व्याजी देवूं. मुदतीस न देवूं तरी दरमहा दरसदे त्यापैकीं सोड घेतली अगर कामाकाजामुळें दरबारास येणें न जालें तेव्हां शागिर्दपेशा + + + + राहील + + + + सरासी + + + + + + + + + + पडले तरी त्याचा यैवज आह्मी वजा करून आह्माकडील कारकुन असला तरी त्याचे विद्यमानें द्यावें कलम १

३

(बंद गहाळ आहे)

४

खानदेशांत समाईक यैवजी सरदारी रुपये १००० पैकीं आमचे तक्षीम रुा २५० आडिचसे पूर्वी राजश्री धिराजी पवार व कैलासवासी दादा यांचे कारकीर्दीपासून घेत आलो त्यापुढें साल दरसाल घेणें. कलम १

आह्माकडे जुना सरंजामपैकीं चौथाई व नवा सरंजामपैकीं दोन तक्षीमा

(फाटलें आहे.)

सरंजाम आहे त्यास दोन्ही मिळोन दामशाही राऊत ठेवून स्वामी सेवा करावी राऊत

१०० जुना सरंजाम

५० बुबाजी पवार बिस्वास-राव

२५ उदाजी पवार

२५ जगजीवन पवार (फाटलें आहे.)

१००

१०० नवा सरंजाम

५६ उदाजी पवार

२७ मानाजी पवार

१७ बाळाजी भोसले

१००

\+ + + +

\+ + +

घेऊन उभयेतां + स्वामी सेवा करावी.

२००

निसी। सदरहुप्रमाणें राऊतासनीं खासा आपण अगर एक पुत्र दोघांतून एकजण एके जागा सेजारी राहून स्वामी सेवा करावी.

एकूण कलमे चौदा + + +

\+ + + + +

लेखांक ३१ तारीख ९–१–१७४५

श्री

राजश्री मालजी सिंदे

गोसावी यांसी

स्नो बाळाजी बाजीराव प्रधान आसिर्वाद. सुा खमस आर्बैन मया व अलफ. मढीचे यात्रेची डबी राजश्री बुबाजी पवार विश्वासराव घेत असतात त्यास तुम्ही कजिया करिता म्हणोन विदित जाहालें. त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी सुदामतप्रों चालवणें. जाणिजे. छ १६ जिल्हेज. आज्ञा प्रमाण

लेखन सीमा

लेखांक ३२ तारीख ११–१–१७४६

श्री

शके १६६७ माघ शुध प्रतिपदा ते दिनीं धनको नाम मातुश्री भिऊबाई पवार मामी यांसी रिणको नाम राघोजी भोसले लेहून दिल्हें खत ऐसाजे, तुम्हापासून घेतले मुदल रुपये १९४ एकसे चौऱ्याणऊ यास व्याज दरमहा दरसदे रुपये १ येकोत्राप्रों देऊं. हें खत लिा सही.

लेखांक ३३ तारीख २७–८–१७४७

श्री

श्रीमंत सौभाग्यादिसंपन्न बाईसाहेब याणी राजश्री बुबाजी पंवार विस्वासराव यासी आज्ञा केली ऐसीजे, राजश्री येकोजी भोसले यांस

सरंजाम देह दाहा प्रांत धुलेबारे पैकीं तुम्हास आज्ञा करून पेशजी देविले आहेत. त्यास तुम्ही देहाये मजकुरास व जमीदारास व कमाविसदारास आलाहिदा सनदा सादर केल्या आहेत. ऐसे असोन सांप्रत मशारनिले तुमचे भेटीस पुण्यास आले त्याजपासी तहनामा लेहून मागता कीं निशाणाबरोबरी खाशासुधा पंचेवीस स्वारानसी चाकरी करावी. यासी अंतर जाहलेस सरंजाम न देऊं. जो सरंजाम देणें हुजूरचे आज्ञेनें दिल्हा आहे. तुम्ही न देवूं म्हटलीयानें सुटतो ऐसा नाहीं. प्रस्तुत त्याजपासी तहनामा न मागणें. जमीदारांस व कमाविसदारांस आपल्याकडील ताकीदपत्रें देऊन मशारनिलेकडील अमलदाराकडे अमल सुरलीत चाले ते गोस्टी करणें. गांवीचा ऐवज दिसोन येईल त्या बरहुकूम चाकरीची आज्ञा करणें ती हुजरोन तह करून दिल्ही जाईल. याचा अमल सुरलीत दाहा गांवांतदेखील वार पेसजी तहत दिल्ही आहे त्याजप्रमाणें गांव देणें. जाणिजे. रुद्राजी जगथाप हुजऱ्या पाठविला आहे. याजबरोबरी ताकीदपत्रें देऊन रवाना करणें. जाणिजे. छ १ रमजान. बहुत काय लिहिणें सही.

रूजु

लेखांक ३४ तारीख २७-८-१७४७

मसोदा असे. श्री

राजश्री बुबाजी पवार

विस्वासराऊ गोसावी यासी

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो वेंकाजी भोसले रामराम विनंती उपरी. सौभाग्यादिसंपन्य मातुश्री बाईसाहेब वाडा पहेला यांणी आमचेविशई तुम्हास आज्ञा केली कीं, यांसी आपल्याकडे चाकरीस ठेऊन खासा मजकूर व आसामी सुमार २४ येकून पंचेवीस सदरहू हमेशा

निशानाबा चाकरी घेणें. यासी सरंजाम देणें. गांव बितपसील कुडाणे १ महींदेले १ देवपूर १ मोहाडी १ बाळापूर १ जकाणे १ भोकर १ कणेर १ सावल १ देसीतोडी १. सदरहु देहे दाहाप्रों धुले हें गांव आपणास मोकासा खेरीज बाबती साहोत्रा व दरबार खर्चाचा जो हिसा गांवगना बसेल तो वजा करून सौभाग्यादिसंपन्ये मातुश्री बाईसाहेब यांच्या विद्यमाणे दिल्हे असे. येसीयासी अपण खासा व आसामी सुमार चोवीस येकून पंचेविस राऊतानसी हमेशा निशाणाबा चाकरी करून सदरहु कराराप्रों सरंजाम खाऊन. यांपैकीं राऊत चाकरींत कमी जाले तरी गांव वजा करून घेणें. खासा अपण चाकरीस न आलो तरी तुम्ही अपला सरंजाम घेणें. अम्हास सरंजामासी तालुका नाहीं. सुहूर सन समान आर्बैन मया अलफ. हें लिहिलें सही. छ १ माहे रमजान

निा

बिकलम

साक्षी

लेखांक ३५ १०--१०--१७४७

श्री

श्रीमंत सौभाग्यादिसंपन्न..............बाई साहेब याणी राजश्री बुवाजी पंवार विस्वासराव यांसी आज्ञा केली ऐसीजे, राजश्री येकोजी भोसले याचे सर्व प्रकारें अगत्य चालवणें. जाणून तुह्मास सांगोन धुळे प्रांते देह १० देविले. तुह्मीही करार केला. ऐसे आसोन मशारनिलेपासी कागदपत्र दस्तऐवज मागता ह्मणून विदित जाहलें. ज्याप्रमाणें करार हुजूर जाहला आहे त्याप्रमाणें तुह्मी सुरलीत गांव त्याजकडे द्यावें. त्यानीं-

ही वर्तावें. तुह्मी प्रस्तुत आधी राऊत घ्याल तरी गांव निकालस देवूं ह्मणून अडथला केला आहे हे गोस्टी कार्याची नव्हे. ज्याप्रमाणें आज्ञा हुजूरची आवशक हुजूरचे त्याप्रमाणें तुह्मी वर्तलिया कार्याची गोस्टी आहे, ऐसे समजोन गांव देणें. जाणिजे. ताकीदी देवून बराबरी जासूद देवून सुरलीत जालेसें करणें. जाणिजे. छ १६ सवाल. लेखन सीमा. सही.

रुजु

लेखांक ३६ इ. स. १७४७

श्री

राजमान्य राजश्री बुबाजी पंवार विस्वासराव यांसी आज्ञा केली ऐसीजे, राजश्री येकोजी भोसले वारी (?) पा। ललिंग प्रा। खानदेश येथें आहेत. त्याचे जरूर प्रयोजन आहे यास्तव त्यास हुजूर यावयाची आज्ञा करून आज्ञापत्र सादर केलें आहे. ऐशियास मार्गाचे सुरक्षितपणें हुजूर आले पाहिजेत. यास्तव तुह्मास हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी तुह्मी मारानिले समागमें आपले स्वार देऊन स्वामी सन्निध सुरक्षितपणें येऊन पावत ते गोष्टी करणें. पाटवाल सुदन असा.

लेखांक ३७ इ. स. १७४७

श्री

राजश्री बुबाजी पंवार विस्वास

राव गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत सदायेसवंत राजमान्ये स्नो। वेकोजी भोसले रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिलें. यानंतर

आह्मी येथें आलों. मागें ईस्कील करून कमाविसदारास लिा कीं आमल न देणें तरी हे गोष्टी नीतीची नव्हे. आह्मी करार केला तेच तहचिटी. व तहचिटीच लागत असली तरी आपन आपल्या वकिलास भगवंतपंतास लिा आहे. त्याजपासोन चिटी ध्यावी व पंचविसा राऊतांनीं चाकरीस आपन आंतर करनार नाहींत ह्मनाल कमाविसदाराचींच चाकरीमधें पंचविस राऊत देऊं ह्मनाल तर हजुर पाटऊन आपल्याकडोन आंतर होणार नाहीं. आपन विस्वासराऊ आसा. वचन खरें करावें. पचंविसा लोकांचे कालहर न होये तें करावें. भगवंतपंत सांगतील त्याजप्रमान कबूल करून कमाविसदारास ताकीदपत्र द्यावें. गांवांचा तपसील जानवावा. येविसई विस्तार काये लिहिने. याबाा बाबती व साहोत्र्याचा तपसील सनदेमध्यें लिहिला तरी प्रुथुक प्रुथुक कजिया रयेतीस कोठवर करावा. दरोबस्त वसूल आह्मांकडे घेऊन जो आकार होईल त्याच्या बाबती व साहोत्रा कमाविसदाराकडे आपन देऊं. रयेतीस मुजाहिम न होत येसे त्याहावें. येविसई विस्तार काये लिहिने. लोभ असो दीजे हे विनंती.

लेखांक ३८ इ. स. १७४७–४८

श्री

नेमउतर सके १६६९ प्रभव नाम सवत्सरे मार्गेस्वर वद्य द्वितीया ते दिवसीं चिरंजीव राजश्री बुबाजी पंवार विस्वासराऊ यांस जगदेराऊ पंवार कारणे नेमउतर लेहून दिल्हें येसेजे, राजश्री उदाजी पंवार व येसवंतराव पंवार यांच्या व आमच्या सरंजामाचा व वडिलाच्या कर्जाचा कजीया आहे ह्मणवून तुह्माकडे राजश्री स्वामीणी पंचाईत नेमून पाा त्याजवरून तुह्मापासी आलो. तुह्मी आह्मांस आज्ञा केली कीं, मार्गेस्वर वद्य येकादसीस राजीनामा व जामीन आणून देणें. तें आपण

कबूल केलें. आजपासून दाहवे रोजीं एकादसीस आपण जामीन व राजीनामे अणून देऊं. यासी अंतर न करूं. हें नेमउतर लिा सही.

मोर्त
ब सुद

लेखांक ३९ तारीख १२-२-१७४८

श्रीनकल

राजमान्य राजश्री गोविंदपंत गुमास्ते

सरदेशमुख ता बारागांव नांदूर गोसावी यांसी.

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुा समान आर्बान मया व आलफ. का मजकूर येथें नवे कुसू राजश्री बुबाजी पंवार विस्वासराव बांधणार त्यास जुने पांढरीची माती नेऊन कुसू बांधतील त्यास बांधू देणें. कोणेविसी मुजाइम न होणें. जाणिजे. छ २३ सफर.

लेखांक ४० तारीख १२-१०-१७४८

श्री

चिटी वाटणी निसबत राजश्री बुबाजी पवार. सके १६७० विभवनाम संवछरे कार्तिक शुा १ प्रतिपदा सन हजार ११५८ कारणें वतनी गांवपैकीं वांटणी बितपसील

मौजे सुपे प्रा पारनेर	कसबे नांदूर ता मजकूर
१ मोकदमी पाो निमे मोकदमी	१ मोकदमी पाो चौथाई
१ मुकास बाब	१ मोकासा
२	२

मौजे गणेगांव प्रो कर्डे सुभा १

येणेप्रमाणें घेऊन सुखरूप राहावें. यासी आन्येथा न करावी. मौजे जेऊर राजेश्री जिवाजी पवार याणी समाइकांत घेतलें आसेल ते नाहीं म्हणतात. याजकरितां तहकीक जाले तर समाईक चौधाचा आसे. हें वांटणीपत्र लिहिलें सही. बिा चांदो विश्वनाथ मुा मौजे गणेगांव. सदरचे भावबंदाचे कागद.

लेखांक ४१ तारीख २१-१०-१७४८

श्री

राजश्री त्रिंबक खंडेराऊ

व राजश्री अनंदराऊ त्रिंबक गो

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो बुबाजी पंवार विस्वासराऊ दंडवत. सुा तीसा आर्बैन मया अलफ. राजश्री जगजीवनराऊ पंवार याणी साल गुा दरबार खर्चाच्या यैवजी तुम्हाकडोन यैवज देविला आहे, त्या यैवजी राजेश्री विसाजीपंत यांस रुपये १०० सेमर देविले आहेत. देणें. जाणिजे. छ ९ जिल्काद. बहुत काय लिहणें.

मोर्तब
सुद

लेखांक ४२ तारीख १२-५-१७४९

श्री

चिरंजीव विजईभव राजमान्य राजेश्री मानाजी पंवार यासी प्रति भिऊबाई पंवार आसीर्वाद. सुा तिसा आर्बैन मया व आलफ सन ११५८.

कारणे लिहून दिल्हे ऐसेजे, चिरंजीव राजश्री माधवराव विश्वासराव लेकरू दरबारीं फड संपादून सरदारीचे संवरक्षण जाहले पाहिजे यानिमित्य तुह्मी राजश्री पंतप्रधान याजकडील तुमची चाकरी तुह्माकडोन सोडवून आपली याकडे ठेविले त्यास जमावाचे बेगमीस राजश्री धीराजी पंवार बद्दल निमे तक्षीम सरकारांत होती ते समाईक खर्च दंडकप्रमाणें वजा होवून पेस्तर साला कारणें तुम्हास मोकासा दिल्हा आहे. चालऊन यांतून पूर्वी फूट मुकासे तुम्हाकडे आहेत ते आमचे आह्मास द्यावे. शके १६७१ जेष्ठ शुध ७ सप्तमी. हा आशीर्वाद. हस्ताक्षर रंगो चिंता.ण फडनीस.

साक्ष

गंगाजी त्रिंबक विसाजी राम

१ १

लेखांक ४३ इ. स. १७५०

श्री

गंगाजल निर्मळ भिऊबाई पंवार

यांसी

प्रति पूर्वक गोविंद खंडेराव चिटणीस कृतानेक विनंती उपरी. येथील कुशळ जाणून स्वकीय लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. सांप्रत तुमचे येणें राजदर्शनास हुजूर जाहलें नाहीं नूतन प्रसंग जाहला आहे. या समयांत तुह्मी यावें हें गोष्ट उचित आहे, तरी तुह्मी कोणे गोष्टीची चितांत संदेह न धरितां राजश्री माधवराव पवार विश्वासराव यांस घेऊन सत्वर येणें. वसवसा येकंदर न धरणें. दिवसगतीवर पडो न देतां त्वरेनें यावयाचें करणें. वरकड कितेक अर्थ राजश्री राघोपंत मजमदार यानीं

लिहिला आहे त्याजवरून कळों येईल. तुह्माकडील साहित्यास पूर्वीही अंतर जाहलें नाहीं व पुढेंही होणार नाहीं येविसी समाधान असो देणें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

लेखांक ४४ तारीख २७-५-१७५०

नकल श्री

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री देशमुख व देशपाडीय व मोकदम व कुलकर्णी कसबे नांदुर बारागांव प्रगणे मजकूर यांसी भगवंतराव राम देशमुख अहमदनगर व पाडीय पेडगांव ऊपरी. तुह्माकडे अपलें कर्ज साडे चवतीससें होतें. तुमच्या वडिलाचे रोखे त्यांत गाहाण वतन निमे देशमुखी व देशपांडीयपण व पाटीलकी व कुळकर्ण होते. तुह्मास मागितले. न द्या निदान श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांजपासी निवेदन करून रोखे दाखविले. वाजवी जाचून तुह्मास बोलाऊन ताकीद केली. आठ नव महिने तुह्मास तगादा लागला परंतु सरंजाम व्याज मुदलाचा होईना. आपल्यास तो गरज फार लागली. तुमची ममता राजश्री तुकोजी पंवार व राजश्री जिवाजी पंवार व राजश्री मानाजी पंवार यांसी यांणी भीड घाळून तुमची नातवानीं सुचऊन खंड करून रुपये दिधले. रुपये ३००० तीन हजार देखील किरकोळ खते दोनसेबासट रुपयाची नांवानिसी निराळी आहे. हे रुपये राजश्री माधवराव पंवार विस्वासराव याणी आपलीयास दिधले ते आपणास पावले. तुमच्या नांवाची फारखती त्याजपासी दिधली. तुह्मी रुपये राव पंवार मजकुरास देणें आण फारखती घेणें. तुह्मास रुपये द्यावयासी आनकूल न पडलें तरी तुह्मी गाहाणवट न सोडविलें तर तुमच्या वडिलांनीं लेहून दिधलें त्याप्रमाणें वतनाचे आधिकारी

होतील. आण भोगवटा घेऊं लागतील. तुमचा उपाये हाच कीं त्याचे रुपये द्यावे. कळलें पाहिजे. छ २ रजब शके १६७२ प्रमोदनाम संवसरे.

गोही

पत्र प्रमाणें साक्ष गंगाजी गोपाळ जोसी कुलकर्णी
मौजे चिचोळी व पिपरी निा भोगाजी भोयरे

लेखांक ४५ माहे मे इ. स. १७५०

श्री

राजश्री तुकोजी पोंवार व राजश्री
जिवाजी पोंवार गोसावी यांसी

छ आखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नेहांकित भगवंतराव राम देशमुख आसीरवाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून निजानंद लिहित आसिलें पाहिजे विशेष. कृपा करोन पत्र पाठविलें तें उत्तम कालीं पावून संतोष जाहला. रोखीयाचा मजकूर लिहिला येसीयास आम्ही श्रावण मासाआंतीं भेटीस येऊं तेव्हां सर्व बर्तमान परसपरें श्रुत होईल. पहिले फारखती वगैरे कागद दिल्हे आहेत त्यांत कांहीं संशय राहिला नाहीं. श्रीमंत राजश्री पेशवे यांच्या विद्यमाने जाहलें आसे. कांहीं संशय राहिला नाहीं. आपण सर्वप्रकारें तुमचे स्नेही आसों. कितेक घराऊ वर्तमान समक्ष भेटीआंतीं कळेल. पत्रीं लिहितां येत नाहीं. बहुत काग लिहिणें कृपा असो दीजे हे विनंती.

लेखांक ४६ तारीख २६-९-१७५१

श्री

\+ \+ चिरंजीव विजई भव राजमान्य

राजश्री माधवराऊ पंवार विस्वासराऊ यासी प्रती जगजीवनराऊ पंवार

कृतानेक आसिर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन कीजे. यानंतर राजश्री सचीव यांजकडील साहोत्राचा यैवज चौतर्फा बिनमख्ता मोकरार रुपये १३०० तेरासे तुम्ही करार केले त्याजपैकीं आमचे तक्षीमेचे रुपये ३२५ सवातीनशें जाले. सदरहु रुपये सवातीश्याची तुम्ही निशा करणें आणि ताकीद मनाईची त्याचे कमाविसदारास घेणें. जें त्याचा अमल परगण्यांत न चालें तें करणें. सवातीशाच्या माहालावर वराता तुम्हास देऊन यैवज पावता करूं. बहुत काय लिहिणें हे आसिर्वाद. सुा इसने खमसैन मया अलफ छ १६ जिल्काद.

लेखांक ४७ तारीख २-१०-१७५१

श्री

राजश्री माधवराव पवार

विश्वासराव गोसावी यांसी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित चिमणाजी नारायेण सचीव आसीर्वाद उपरी. सुा इसने खमसैन मया व अलफ. खासगत वतनी सावोत्रा आहे ऐसीयास तुम्हाकडील सरंजामाचे माहाल आहेत त्यापो तुम्हाकडील तक्षीमा २ व राजश्री जगजीवन पवार तक्षीम १ एकूण तक्षीमा तीन माहाल बिता

सां दौलताबाद	सां संगमनेर
१ पाा कुंभारी	१ ताा हवेली
१ पाा चालीसगांव	१ ताो देपूर
१ पाा झोडगे	१ ताा बेलापूर
१ पाा सातारे	॥ पाा नासिक
४	१ ताा राजूर पाा आकोळें

प्रां खानदेश	॥ पा कोतुळ
१ ता वाघीलबारे	१ पा बारागांव नांदुर
१ पा ललीग	१ पा सेवगांव तक्षीमा २ दोन
२	१ का राहाते खासगीकडे वसूल घेतला तरी सावोत्रियाचा ऐवज सरकारांत देणें
तेरीज माहाल	
४ सा दौलताबाद	
२ प्रां खानदेश	८
८ सा संगमनेर	
१४	

येकूण माहाल चवदा. याची बोली राजश्री मोरो नारायण सुभेदार

*| श्री शंकराजी नारायण |

प्रां कर्डे रांजणगांव याच्या विद्यमानें तीन तक्षीमेची करार जाहली असे. बोलीबा मक्ता करार रुपये ९७५ पावणे दाहासे करार केले असेत. यासी हप्तबंदी मुकरार बेरीज रुपये पौश मास अवल ३०० चैत्र मास ३०० वैशाखअखेर ३७५ येकूण पावणे दाहासे रुपये मशारनिलकडे प्रविष्ट करणें म्हणजे हुजुर येवज प्रविष्ट होईल. जाणिजे. छ २२ जिल्काद. बहुत काये लिहिणें. *| पत्रा वधिरयं भाति |

बार सुरू सुद बार.

* शिक्का व मोर्तब अष्टदली.

लेखांक ४८ तारीख ६-१०-१७५१

श्री

राजश्री माधवराव पवार

विस्वासराऊ गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी नारायेण सचीव असीर्वाद उपरी. येथील कुषळ जाणोन स्वकीये कुषळ लेखन करणें विशेष. मौजे गणेगांव प्रा कर्डे ह्या गांवाबद्दल तुम्हाकडे घोडी करार केली. त्याचे रुपये १२०० बाराशें राजश्री नरसो सामराज यांचेविा केले. त्यापैकीं तुम्ही महीमाजी जासूद याजबा रुपये १२०० बाराशें पाठविले. पैकीं परत जासूद माराबा खोटे सार २ दोन माघारे पाठविले. बाकी रुपये ११९८ आकराशें आठ्याआणव कारकुनीबद्दल २५ पंचवीस हुजूर जमा पोता बाराशें तेवीस आसेत. सुा इसने खमसैन मया व अल्फ. छ २६ जिल्काद. बहुत काय लिहिणें.

*[श्री शंकराजी नारायण]

[पत्रा वधिरयं भाति]

लेखांक ४९ तारीख २३-१०-१७५२

पौ छ १३ मोहरम

नकल श्री

आज्ञापत्र राजेश्री मानाजी पोवार ताा मोकदमानी मौजे कोठे व मौजे वणकुटे प्राा बेल्हे. सुाा सलास खमसैन मया अलफ. दोही गांवांचा यैवज राा म्हाळोजी अडाव याच्या कजात देविला अहे तर यासी तुम्ही

* शिका व मोर्तब अष्टदली.

रूजू होऊन मुक्रास बाबेचा अमल सुरलीत देणें. राघो हरबाजी याजकडे वसूल न देणें. जानिजे. छ १५ जिल्हेज. मारनिलेकडे यैवज देऊन पावल्याचें कब्‍ज घेणें. छ मार

लेखांक ५० माहे ऑक्टोबर १७५१

श्री

राजश्री पंत स
चीव गोसावी यांसी

छ सकल गुणालंकर्ण अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो माधवराव पंवार विस्वासराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आम्हाकडे हुजरून संरंजाम आहे त्याच्याबाा मखता साहोत्रियाचा करार रुपये १३०० तेरासे मोकरार केले आहेत. हे रुपये पेशजीप्रमाणें परभारें पाववितील. रुपये

३२५ राजश्री उदाजी पंवार
३२५ राजश्री जगजीवनराऊ पंवार

बाकी साडे सासे राहिले ते आम्ही पावते करून. यासी अंतर होणार नाहीं. कळलें पाा. बहुत काये लिहिणें कृपा आसो देणें हे विनंती. राजश्री जगजीवनराऊ पंवार याचे तक्षीमेचे रुपये ३२५ सवातीनशें. सदरहू रुपये ९७५ पावणे दाहाशें राजश्री मोरोपंत सुभेदार यांजपासी पावते करूं बाा हाशें

(मुद्रा:) श्री ० श्री राजा रामछत्रपती चरणी दृढ भाव बुबाजी सुत माधवराव पवार वीस्वासराव

(मोर्तब:) श्री मोर्तब सुद

२०० माघ मासीं रुपये
३०० चैत्र मासीं
३७५ जेष्ठ मासीं
९७५

सदरहूप्रमाणें देऊं. बहुत काय लिहिणें हे विनंती.

लेखांक ५१

इ. स. १७५२

श्री

माधवराऊ पंवार

विश्वासराऊ साहेब गो

सावी

छ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्ये आज्ञाधारक पद्माकर कृष्ण आसीर्वाद विनंती उपरी. येथील क्षेम जाणोन स्वकीये कुशल लिहित आज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री जगजीवनराऊ पंवार याची वरात साहोत्रियाची भिकाजी देवजी कमाविसदार याजकडे रुपये २०० पाठविली त्यास त्याची तकसीम श्रीमंत राजश्री पंत प्रधान यानीं जपत केली आहे. यैवज त्याजकडे न पुरे मग आपण बाकीचे येवजी आपणाकडे लाऊन घेतले आहेत. बहुत काय लि + + + (फाटलें आहे) + +

लेखांक ५२

तारीख ३-५-१७५३

श्रीनकल

राजश्री पुंजाजी चव्हाण यासी नारो बाबाजी. सुा सलास खमसैन मया व आलफ. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. मजकूर कलला. का नांदुर

येथील जुनें पांढरीचे कुणबी आपले समाधानें नवे गांवांत येतात. समाधानें राजश्री माधवराव पंवार विस्वासराव यानीं करून आणितात म्हणून लि॥ त्यास उत्तम आहे. जो कुणबी नवे गांवांत येतील त्यांस येऊं देणें. माती दगड व घर मोडून जुने गांवांतील आणितील त्यास कोण्ही हरकत करील तर करूं न देणें. जाणिजे छ २८ माहे जार.

लेखांक ५३ तारीख १०-९-१७५३

श्री

राजश्री माधवराव पवार
विश्वासराव यांसी

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री बाळाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद. सु॥ आर्बा खमसैन मया व अलफ. मौजे सिगवे केशव पाटील सेवगांव येथील मोकासा तुह्माकडे होता त्यास सालमजकुरीं मोकासा दूर करून राजश्री रामराव नारायण यास दिल्हा असे. तरी तुह्मी मौजे मजकुरी दखलगिरी न करणें. मशारनिले अमल करितील यास मुजाहिम न होणें. जाणिजे. छ १२ जिल्काद. बहुत काय लिहिणें.

० श्री ‿
राजा शाहू नर
पति हर्ष निधान
बाळाजी बाजी
राव प्रधान

लेखन
सीमा

लेखांक ५४ १३-९-१७५३

श्री

यादी सनदी पत्रें शके १६७५ श्री मुखनाम संवत्सरे सुा आर्बा खमसैन मया व अलफ सन ११६३.

भाद्रपद वद्य १ छ १४ जिल्काद राजश्री माधवराव व अपाजीपंत पुणियासी गेले. तेथें राजश्री पंत प्रधान याजजवल रा व्यैंकाजी भोसले याणी विदित केलें कीं कैलासवासी माहाराज याणी धुलेबारो येथील गांव १० दिल्हे आहेत. करार करून द्यावे. त्याबद्दल राजश्री आपाजीपंती लिा कीं, बुबाजी पंवार याणी मारनिल्हेचे कागद घेतले आहेत ते पाा देणें. त्याजवरून पत्र पाठविलें. हा रघुजी लगड व रायाजी जासूद

१ माहाराजाचें पत्र वेंकोजी भोसले याचे नांवाचें.

१ माहालचें पत्र बुबाजीबावाचे नांवाचें.

२ व्यकोजी भोसले याणी बुबाजीबावास पत्र लिा तें.

१ पत्र मारानिलेजवलून मागून घेतलें तें यादो गिरमाजीजवल होतें तें.

१ किता

२

पंचविसा रावतानसी चाकरी करावी येसी बोली.

१ सुभानजी भोसले याणी बुबाजीबावास लिहिले तें.

५

येकूण पत्र ५ पांच पाठविलीं आहेत. फिरोन आलीं पत्रें ५

साक्ष गोपाल + +

लेखांक ५५ माहे सप्टेंबर १७५३

श्रीशंकर

राजश्री माधोराव विस्वास

राव पवार सुभेदार साहेबाचे

शेवेसी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित बाबूराव रामराम (राजाराम ?) आसीर्वाद विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये लिा यानंतर आपण श्रीमंतासमागमें सैन्यांत गेला होता. मागें बैशाख मासीं सुप्यास आलो होतो. मातोश्री बाईची भेट घेतली. मौजे सिगवे प्रा सेवगांव येथील मोकासा श्रीमंतानीं तीर्थरूप राजश्री रामराव नारायेण यास कृपावंत होऊन दिधला. साहेबासही पत्र दिधलें होतें तें मातुश्री बाईस राजश्री अपाजीपंताचे विद्यमानें पावतें केलें. बाईनीं ताकीदपत्र कमाविसदारास दिधलें कीं मौजे सिगवे येथील मोकासा श्रीमंतानीं रामराव नारायेण याजकडेस दिधला आहे त्यास आपणही मोकासा त्यासी दिधला ऐसें ताकीदपत्र कमाविसदारास दिधलें तें त्यास पावत केलें. सन ११६३ सालचें कामकाज गांवचें तो विल्हेस लागेल. त्यास हल्लीं कमाविसदारानीं साहेबाचे नांवें पत्र सिकियानसी याचा उजूर केला कीं यजमानचें नांवें पत्र सिकियानसी आणविणें. यास्तव साहेबास पत्र लिहिलें असे, तर साहिबी कृपा करून कमाविसदारास ताकीदपत्र पाठविलें पाहिजे. आह्मां चाकरलोक आसो. विशेष विस्तार करून लिहावें तर साहेब सुज्ञ आहेत. तर राजश्री बाबुराव रूद्र कमाविसदार यास आपलें पत्र सिक्कियानसी पाठविलें पाहिजे कीं गांवास उपसरग न देत. बहुत काय लिा हे विनंती.

लेखांक ५६ तारीख ३१-१०-१७५२

पैवस्ती सन आर्बा मार्गेस्वर श्री
शुध ७ छ ५ माहे सफर

चिरंजीव विजयी भव राजमान्ये राजश्री माधोराव पवार विस्वासराव यासी प्रती जिवाजी पवार आसीर्वाद उपर. येथील कुशल ता। छ ४ मोहरम मो। निकलंक पा। देवास जाणोन तुम्ही आपले कुशल हरघडी लिहित जाणें विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. बर्तमान विदित जालें. त्यासी विस्वासराईचा सरंजामाचा मजकुर लिहिला त्यासी रो। उदाजी पवार व जगजीवन पवार ते आपले तकासिमीचे राऊत देतील त्याप्रमाणें आपण देसीं आलियावर तजेविज करून देऊं. तुम्ही रावताचे आगोधर आम्ही देवाशांत होतो त्यावेलेस तुमचें पत्र आलें असतें तर राऊताची तजेविज करून दिल्हे असते. आतां आपण मुलुखगिरीस चालले त्यासी आतां तुमचीं पत्रें आलीं तर आपण देसास आलियावर रावताचे उदाजी पवार व जगजीवन पवार ते आपले तकासिमेचे देतील तर आपण आपले तकसिमीचे देऊं. कलावें. आपन देसास आलियावर जसें विल्हें लावायाचें असेल तें लाऊन. परंतु दरबारचा प्रसंग राखणें. गई न कीजे. बहुत काये लिहिणें हे आसीर्वाद.

मोर्तब
सुद

लेखांक ५७ तारीख २-११-१७५२

श्री

श्रीया (सह) सहश्रायु चिरंजीव विजयी भव राजमान्ये राजश्री मादोवराव पवार विश्वासराव यासी तुकोजी पवार कृतानेक आसीर्वाद उपरी. येथील

कुशल जाणुन ता। कार्तिक सुधे ७ पर्येंत मु॥ पानबोहारें प्रा॥ उजन मजल दर मजल श्रीमंत राजश्री रघुनाथराव दादा यांस आटोपीत जात आहों. विशेसें तुम्ही पत्र पाठवलें तें पावलें. पावुन सर्व वर्तमान कळों आलें. त्यास तुम्ही पत्रीं लिहलें कीं राजश्री त्रिसाजीपंत याही श्रीमंत राजश्री पंत प्रधान यांचे दरबारीं मेहनत पंतमाारनिले याही केली म्हणून लि॥ त्यास सर्व प्रकारें पूर्वींपासून उभारणी तेच करीत आले आहेत आण पुढेंही उभारणी सरदारीची तेच करतील. त्याहावें यैसें नाहीं. तुम्ही रावताबिसी लि॥ कीं चिरंजीव राजश्री जिवाजी पंवार यांस पंनासा रावताची ताकीद करून राऊत पनास पाठवित यैसे करणें. त्यास आपण राजश्री रावजी गंगाधर यास बोलाऊन सांगितलें. त्यास त्याच उप्रती उतर चिरंजीवानीं लिहिलें आहे त्यावरून सर्व ध्यानास येईल. मुखे गोष्ट हेंच कीं तुम्ही दरबारीं राहून चाकरी रूजु केली पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा आसूं दीजे हा आसीर्वाद.

मोर्त ब सुद

लेखांक ५८ तारीख ८-१२-१७५१

श्री

राजश्री माधवराव पंवार

विस्वासराव गो॥ यांसी

छ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्मो॥ गोविंद खंडेराव चिटनिविस रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहिणें विशेष. तुम्हांकडे चौसाला वर्शासन येणें त्याऐवजी रुपये १५० दीडसे

मारफत राजश्री विसाजीपंत पावले. रा छ १२ माहे सफर सुा आर्बा खमसैन मया अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती

\+

श्री
श्री राजाराम छत्र
पती चरणी तत्पर
रामराव जीवाजी
चीटनिवीस नि
रंतर

लेखन
सीमा

लेखांक ५९

इ. स. १७५३

श्री

यादी निा राजश्री माधवराव पंवार विस्वासराव निमे सरंजाम याची हिसेबीं जमा लिहिली आहे त्याखेरीज आपले गांव गेले आहेत याचा आकार आजमासें जमा

	रुपये	
	६६००	
पा नासिक		पा संगमनेर × ×
११ किल्याखाले गांव	३००	बहादुरवाडी तर्फ देवपूर
१ टाके		निा मल्हारजी होळकर
१ मौजे झारवड	२०००	कसबे वावी
१ माणिक खाबा	२३००	
१ मुकणे		प्रगणे कुंभारी आजमास
१ कुरंगवाडी		जमा
१ रायेआंबे	१५००	कसबे संवत्सर

\+ शिका व लेखन सीमा अष्टकोनी.

१ टाकोद	६००	पिंपळवाडी महालांत
१ मालुंज	३००	कोपरगांव धर्मादाव उमा-
१ दवडद		रुसी हुजुरून मोकासा
१ कामतवाडे	२४००	
११		प्रांत पुणें मौजे पिंपळे
२ धर्मादाव चालत आहे		सवदागर आजमासें जमा
१ विहीत गांव तिमया		रुा ४००
गोसावी		आलकुटी प्रा कर्डे नि॥
१ सीवली त्रिंबकभट खेडकर		गजराबाई बांडे आजमास
२		जमा रुा ५००
१३ पैकीं वजा धर्मादाव देहे २		
बाकी देह ११ यासी आज-		
मासें जमा रुा १०००		

लेखांक ६० इ. स. १७५३

श्रीशंकर

राजश्री माधवराव पवार विस्वास-
राव गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो बाजी येशवंत आसीरवाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल हर घडी लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. आपण कृपा करून पत्र पाठविलें. पावोन परम समाधान जालें. लिहिला आभिप्राये कळों आला + + + गांवचा मजकूर लिहिला कीं मोकास बाबीचा वसूल देत नाहीं तरी तुम्ही त्यास ताकीद पत्र देणें

म्हणोन लिहिलें त्यास त्या गांवचा आम्हाकडे कांहीं नाहीं. पागेकडे आहे. गु।।चा येवज तो आपणास पावला आहे. कांहीं बाकी राहिली नाहीं. हल सालचा विचार तो आपलियासी विदित आहे. गांव लस्करचेमुळें खराब जाला. घरमात्र वांचविली. त्यामधें आपण कांहीं दुसरे नाहींत. जे रा। मल्हारजी होलकर तेच तुम्ही. आम्ही कांहीं त्यावें यैसें नाहीं. सर्व जाणतच आहे. विशेष त्याव तरी आपण सुज्ञ आहेत. बहुत काये लि।। ही बिनंती

लेखांक ६१ तारीख २५-५-१७५४

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ

स्वामी गोसावी यांसी

पो। बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणें विशेष. राजश्री माधवराव पवार विश्वासराव याच्या सरंजामाचा तह पेशजी करून दिल्हा आहे त्याप्रों सरकारच्या कमाविसदारास ताकीद करून मारनिलेच्या मुकास बाबेचा अमल देवणें. तह करून दिल्याप्रों मामलेदार चालत नाहींत त्यास ताकीद करून तह पूर्वी करून पुणियांत दिल्याप्रों सुरलित अमल देवणें. जाणिजे. छ २ साबान. बहुत काय लिहिणें हे विनंती.

लेखांक ६२ तारीख १६-८-१७५४

श्री

श्री ०
श्री राजा राम छ
त्रपती चरणी दृढ
भाव बुबाजी सु
त माधवराव प
वार वीस्वासराव

आज्ञापत्र राजश्री माधवराव पंवार विस्वासराव ताा मोकदम मौजे हिंगणी प्राा करडे. सुाा खमस खमसैन मया अलफ. श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामी यानीं मौजे मजकुराकडे साल गुदस्ताची बाकी आहे त्या ऐवजी रुपये २०० आम्हास देविले आहेत. बजिनस आज्ञापत्र सादर आहे तरी सदरहु रुपये दोनसे मौजेमजकुरच्या माहाराबराबरी पाठऊन देणें आण जाब घेऊन जाणें. जाणिजे. छ २६ सवाल

मोर्तब सुद

लेखांक ६३ तारीख २५-१०-१७५४

श्री

फेरिस्त वतनी गांव काा नांदूर बारागांव बहिर्जी जाधव याजपासी होते ते सुप्यांत घेतले. शके १६७६ भावनाम संवछरे कार्तिक सुध्य १० माा मातुश्री आवडुबाई पंवार. सुाा खमस खमसैन साार राा माधवराव पंवार विश्वासराऊ + + + + +

लेखांक ६४ इ. स. १७५३-५४

सुभा राजश्री माधवराव पंवार विस्वासराव स्वारी श्रीमंतासमागमें प्रांत कर्णाटक. सुा आर्बा खमसैन ११६३

	स्वारी खर्च रुपये २८०० पो आलाहिदा
	सदरहु खर्च रुपये १३४२।.
	बाकी खर्च रुपये १४५७।।.
	पैकीं वजा सरकारचा रोजमरा आला
	रुा ८५३ बाकी खर्च रुपये
२०००	कापड लोकांस
७०	हुल स्वार असामी २
५८४।।	सामीतपेसे
५०	ढाले असामी माहार २
६३०	खासदार व पखाली व कोटवल आसामी २१ दर रुा ३० प्रा।
२५०	जासूद आसामी ५ दर ५० प्रा।
१०५६	पालखी सरकार

लेखांक ६५ इ. स. १७५३-५४

श्रीराम

हिसेब सुभा राजश्री माधवराव पवार विस्वासराऊ. सुा आर्बा खमसैन मया अलफ ११६३ तहाचे साल खर्च रुपये

२०९।- मुा पुणें गुा विसाजीपंत तहाचे कामामुळें

रुपये

१०० आमृतराव चिटणीस खर्च साल गु॥ आदा सालमजकुरीं

१०९।॓ पोट खर्च

२०९।॓

राऊत चाकरीस खेरीज कापड तैनाती नख्त रुपये

× × × ×

६०४।॥॰ स्वारी खर्च प्रांत कर्णाटक श्रीमंतासमागमें इ॥ छ ११ रबिलाखर माघ ता॥ छ १३ साबान जेष्ट हिसेब गुजरात गंगाधरपंत रु॥ २८०० पौ अलाहिद बा॥ मु॥हिरे

९४२॥॰ सिलेदार रोजमरा

२३६॥॰ बारगीर

१३८ बाजे लोक

२५ कर्ज दादन नागुजी पारखे

१३४२।॰

लेखांक ६६ इ. स. १७५३–५४

श्री

हिसेब दरबार खर्च वर्सासनें कारकून दिमत श्रीमंत राजश्री पंत प्रधान इ॥ सु॥ आर्बा खमसैन सन ११६३ पासोन मोकाशाचा तह पचम हिशाचा + + + त्यापासोन वरसासनें करार.

फडनीस इ॥ सन आर्बा रा॥ महिपतराव चिटनीस इ॥ खमसैन सन ११६३ ता॥ सु॥ सु॥ आर्बा खमसैन ११६३ ता॥ सबा सितैन सन ११७६ साले सु॥ सबा सितैन मया व अलफ

9922

१४ दरसाल रुो २०० प्रमाणे
रुो २८००
रूो
२०० सुा आर्बा खमसैनांत मुा पुणें गुा रो विसाजीपंत.
२०० सुा खमस खमसैन सन ११६४ गुा गोपाल नीलकंठ हिसेब मुा पुणें.
५०० सुा समान खमसैनांत स्वारीमधे धोंडभट आध्यापक याची चिठी दिल्ही गुा रो विसाजीपंत.
४०० सुा इहिदे सितेनांत सन ११७० गुा बगाजी गंगाधर राजश्री बाबूजी नाईक याचे स्वारींत दिल्हे.
२०० सुा सलास सितैन मया व अलफ सन ११७२ साल निा राजश्री चिंतो विठल स्वारी मिरज.
३५० सुा आर्बा सितैन ११७३ व सुा खमस सितैन ११७४ साल २ गुा रा बगाजीपंत लस्करांत मोहिम हैदर नाईक याचे रुो ३८१॥ऽ

सन ११७६ साल मजकूर साले १४ दरसाल रुो २०० प्रमाणें
२८०० रुो
रुो
२०० सुा आर्बा खमसेनांत गुा रा विसाजीपंत मुा + + + ११६३
२०० + + खमसेन ११६४ गुा गोपाल नीलकंठ हिसेब मुा पुणें.
२०० सुा समान खमसैन ११६७ स्वारीमधें + + + ध्यापक या + + + ल्ही गुा विसाजीपंत.
३०० सुा सितैन + + मधें गुा रा + + + बाबुजी नाईक याचे स्वारीमधें दिल्हे हिसेब गंगाधरपंत.
२०० + + इहिदे सितैन ११७० गुा बगाजीपंत स्वारी रा बाबूजी नाईक लस्करांत दिल्हे.
८०० सुा सलास सितैन सन ११७२ स्वारी + + + दादासाहेब कार्तिक +

पैकीं वजा मोहराचा बटा रुो ३१॥।= बाकी यैन

१८५०
बाकी देणें रुो ९५०
सुा समान सितैन २००
११७७
११५०

रा आबा मजमदार इा सुा आर्बा खमसैन ११६३ ब्या सुा इसने सितैन ११७० साले ८ दरसाल रुो १२५ प्रमाणें रुा १००० रुा

१२५ सुा आर्बा खमसैन मुा पुणें गुा रो विसाजीपंत सन ११६३ मधें.

१२५ सुा खमस सितैन सन ११६४ मधें मुा पुणें.

३७५ सुा समान खमसैन ११६७ स्वारींत धोंडभट आध्यापक याजकडून देविले चिठीनें गुा रो विसाजीपंत.

१२५ सुा सितैन ११६९ पुण्यांत गुा रा बगाजीपंत सन ११६८ बा दिल्हे.

१२५ सुा सितैन ११६९ मुा नगर लस्करांत गुा विसा-

वद्य ३ स दिल्हे रुो +
पैकीं आलाहिदा देणें + + जीबावा रुा + + + रा विसाजीपंत + +

१५० सुा खमस सितैन ११७४ स्वारी श्रीमंत दादासाहेब गुा रा मल्हार आ + जी नासिकची जफ्ती मोकळी करावयासी गेले होते त्यानीं दिल्हे

२०५०
बाकी देणें रुो
व्यंकाजीपंत पोतेनीस यासी वरसासन पेशजी होते दरसाल + + याप्रमाणें फडशा हैदर नाईक याचे मोहिमेच्या स्वारींत रा बगाजीपंत व रा रावजीपंत यानीं करून सन ११७३ सुा आर्बा सितैन पासोन ज्याजती वरसासन रुा ६० केले त्याचा फडशा दरसाल रुो १६० प्रों सन ११७५ सुा सीत सितैन + + + बाकी देणें सालमारीं सन ११७६
सुा सबा सितैन १६०
सुा समान सितैन १६०
३२०

जीपंत केशव नाईक याजकडून देविले.

२०० सुा इहिदे सितैनांत ११७० मधें घेतले गुा बगाजी पंत लस्करांत दिल्हे बाबूजी नाईक याचे स्वारींत.

१०७५

बाकी देणें फाजील सन ११७१ कारणें ७५ रुो

यासी पुढें घालमेलीची सालें दोन.

१ सुा इसने सितैन ११७१ आबा मृत्य पावले ते साल

१ सुा सलास सितैन ११७२ मजमु निा घोरपड स्वारी श्रीमंत राा दादासाहेब.

२

याहून पुढें राा बाबूराव दीक्षित मजमदार देणें इा सुा आर्बा सितैन ११७३ ताा सालमजकूर सुा + + सितैन ११७६ साल ४ दरसाल पेशजी प्रमाणें रुा १२५ येणेप्रों देणें.

---रुो ५००

यासी परभारें खानदेशांत चालीसयासी हिंदुस्थानचे स्वारींत ३२५ पावती रामाजीबावा परभु निा चिटणीस दरम्याल रुो २५ प्रों साले १४ येकूण मो रुा३५०

यासी वसूल रुा

५० मुा पुणें सुा आर्बा खमसेन व खमस खमसेन साले २ सन ११६३ + सन ११६४

१०० सुा सलास सितैन ११७२ स्वारी श्रीमंत राजश्री दादा साहेब कार्तिक मासीं दिल्हे महिपतरायाजवल

५० सुा आर्बा सितैन व मुा खमस सितैन ११७४ स्वारींत गुा बगाजीपंत मोहिम हैदर नाईक +

२५०

बाकी देणें रुा

रामचंद्रजीस बरशासन + + पासोन केले २५ प्राा देणें

साले ३ रुो ७५

यासी वसूल करणाकांत जातां सन खमस सितैनांत गुा मल्हार आपाजी

गांवच्या यैवजी सन ११७६ मधें घेतलें म्हणून कादारानीं लेहून पाठविलें रुो ३५०

कारकून निा फडणीस यासी वरसासन दरसाल रुा ५० पाा पेशजीपासोन आहे त्यास राजश्री रावजीपंत व बगाजी- पंतानीं सन खमस सितैन ११७४ पावेतों लस्करांत फडशा केला. पुढें देणें सन ११७५ सुाा सित सितैन ताा साल मजकूर सुाा सबा सितैन साल २ रुा १००

झडती स्वारी हिंदुस्थान हिसेब गुाा बगाजीपंत रुा

१०० बगाजी रघुनाथ निा फडनीस

१०० गणशेपंत व विनायकपंत दफ्तरदार निा फडणीस

५४ बाबूराव दफ्तरदार

३२५ बापू पोतनीस दुसाला रुो.

———————— रुो २५

कामाकाजामुलें दिल्हे + + + गुाा रावजीपंत व + + + पंत सन ११७४ मधें दिल्हे

बगाजी रघुनाथ निा फडणीस रुा १००

मोरोबाकाका निा चिटणीस रुा २५

मजमदाराचा कारकून पेशजी होते + + + परंतु आतां + + + आबा मृत्य पावले + +

लेखांक ६७ इ. स. १७५४-५५

सुभा राजश्री माधवराव पवार विस्वासराव स्वारी राजश्री माहादाजी आबाजी पुरंदरे प्रांत कर्नाटक खर्च रुपये सुाा खमस खमसैन ११६४

स्वारी खर्च रुा २९०९॥। पो आला-
हिदा. सदरहु बा मुाहिरे १५६०।
रुपये बाकी स्वारी खर्च रुा १३४०।।
पैकीं वजा सरकारचा रोजमरा आला
रुा ९४८ बाकी खर्च रुपये

७०	हुल स्वार असमी २ कापड
९३०॥	शागरीदपेसे
७५०	खासदार व पखाली आसामी २५ दर ३० प्रों
३०००	कापड लोकांस
२००	जासूद आसामी ४ दर ५० प्रमाणें रुपये
२११२	पालखी २
	१०५६ सरकार
	१०५६ दिवाण
	२११२
४००	गंगाधरपंत सिकेनीस

लेखांक ६८

इ. स. १७५४-५५

श्री

हिसेब सुभा राजश्री माधवराव पंवार विस्वासराव. सुा खमस खमसैन मया व अलफ सन ११६४ खर्च रुपये

१००	राो गोविंदराव चिटणीस प्रभु साताऱ्याचे राऊत चाकरीस खेरीज कापड नख्त तैनात रुपये

१२५ संभाजी कदम
१०० बिठोजी दलवी
६५ चरणदास
६० तुलाजी काले
५० हरिराम बैरागी
५० आनंदराव खर्डे

सिलेदारदेखील रोजमरा

४०१।.। स्वारी खर्च हिसेब गुा गंगाधर विश्वनाथ इा छ २६ रबिलोवल पौष ता छ २२ साबान जेष्ट स्वारी रो माहादाजी आबाजी पुरंधरे यासमागमें प्रांत कर्णाटक खर्च रुपये २९०९॥।

पौ अलाहिदा बाा मुाहिरे
६३५॥ सिलेदार
३६७ बारगीर
५५७॥ बाजे लोक
१५६०।.

लेखांक ६९ तारीख ३-३-१७५५

श्री

विनंती सेवक बालाजी माहादेव* कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ १९ माहे जमादिलोवल पावेतों स्वामीच्या कृपावलोकनेंकरून

* बालाजी माहादेव यांचें उपनांव माडवगणे होतें.

सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. साल गुदस्ता पवाराच्या संरंजामाची नेमणूक करार करून बंदोबस्त स्वामींनीं करून दिल्हा त्याप्रमाणें पवारास चाकरी नेमिली. आज्ञेप्रमाणें चाकरीही गुदस्ता जाली; परंतु संरंजामास ऐवज मोकासबाबेचा तह माहालानिहाये करार करून दिल्हा त्यापैकीं ता। हवेली संगमनेर व ता। देपूर बेलापूर या तरफास सालगुदस्ता आफतीमुळें तोटा आला. त्यामध्यें देपूर व बेलापूर या दोही तरफास फारच तोटा आला. यामुळें मोकासियाकडे ऐवज नेमणुकेंत कमी पडला. लोकांनीं चाकरी केली त्यास द्यावयास ऐवज कमी आला व सरकारांतही मशारनिलेनीं नजर सालगुदस्ता दिल्ही त्या ऐवजाचाही भरणा होवा; परंतु अफ्तीमुळें माहालीं तोटा आला यामुळें ऐवजास जागा नाहीं ह्मणून मशारनिलेकडील कारकून सेवेसी विनंती करावयासी आले आहेत. ते विनंती करतील. तीतें ध्यानास आणून आभयेवचन देणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना.

लेखांक ७० तारीख २०-६-१७५५

श्री

फेरिस्त खतें यादो सिधेस्वर यानीं मातुश्री भिऊबाई पंवार यांच्या नांवाची दिल्ही. सुा सन सीत खमसैन मया आलफ. शके १६७७ युव नांव संवछेर सन हजार ११६५ जेष्ठ शुध ११

लेखांक ७१ तारीख ९-८-१७५६

श्री

राजश्री माधवराव वि

स्वासराव पंवार गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्मो बालाजी बाजीराव

प्रधान आसीर्वाद. सुा सबा खमसैन मया व अफ्ल. तुम्हास कार्यास पाठवावें लागतें तरी तुम्ही आपले पथकाची तयारी करून सिध असणें. भा (द्रपद पौ) र्णिमेअखेर + + + + इल जाणिजे. छ १२ × × बहुत काय लिहिणें.

० श्री ~
राजा शाहू नर
पति हर्ष निधान
बाळाजी बाजी
राव प्रधान

लेखन
सीमा

लेखांक ७२ तारीख १-८-१७५७

नकल श्री

राजमान्ये राजेश्री त्रिंबक कादार

का बारागांव नांदूर नि समसेर बाहदर गो यांसी

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुा समान खमशेन मया अलफ. राजेश्री माधवराव पंवार विस्वासराव याचे × × × रा व रान पुरातन आहे त्याविशयीं तुम्ही खलेल करिता म्हणून विदित जालें. तरी मानुलेकडे पुरातन कुरण आसतां खलेल करावयाचें प्रयोजन काये. हालीं हें आज्ञापत्र × × असे तरी सालगुास्ता कुरणाविषयीं हुजुर × × ताकीदपत्र सादर जाहलें आहे त्याप्रों कुरण मारनुलेकडे चालू देणें. कोणीही कुरणास उपद्रव न लागे, बोभाट वांरवार न ये तें करणें. जाणिजे. छ १५ जिल्काद ज्या प्रानें कुरण याजकडे चालत आलें आहे त्यास × × न करणें. जाणिजे. छ मार आज्ञा प्रमान.

लेखांक ७३ तारीख २९-१०-१७५७

श्री

राजश्री माधवराव पंवार

विस्वासराव गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो राजे विठलराव सिवदेव उमदेतुलमुलिक बाहादर आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणें विशेष, धोंडजी पंवार याणी रा मेघश्यामपंत याजपासून कर्ज घेतलें. मारनिलेनीं आमच्या सरकार कारकुनापासून ऐवज घेऊन त्यास दिल्हा. त्यास चार वर्षें जालीं. अद्यापि कर्जाचा निर्गम करून दिल्हा नाहीं. त्याजवरून हलीं तुम्हास लिहिलें आसे, तर पंत मारनिलेच्या कर्जाचा निकाल करून देणें. नाहींतर धोंडजी पंवार यासी येथें पाठवून देणें. त्याचा अम्ही बंदोबस्त करून देवूं आणि त्याचे कर्जाचाही बंदोबस्त त्याजकडून देविला जाईल. जरी करितां तुम्ही कर्जाचा निकाल करून न दिल्हा व धोंडजी पंवार यासी न पाठविलें तर आम्ही माहालीं मोकाशाचे ऐवजी सदरहू कर्जाचे व्याजसुध्धां घेतले जातील. यास्तव आगोधर सूचना लिहिली असे. रा छ १५ माहे सफर. बहुत काय काये लिहिणें हे विनंती.

श्री
लक्ष्मी नृसिंह
चरणी तत्पर राजे
विठलराव सिवदेव
उमदतुलमुलक
बहादर

मोर्तब
सुद*

* शिक्का व मोर्तब बदामी आकाराचे.

लेखांक ७४ तारीख १२-११-१७५७

नकल श्री

श्रीमंत रा॥ माधवराव पंवार वि

स्वासराव गोसावी यांसी सेवेसी

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ त्र्यंबकजी नाईक रामराम विनंती उपरी. विनवावया प्रार्थना ऐसीजे. येथील क्षेम ता॥ छ २९ सफर येथास्थित जाणून स्वकीय लेखन आज्ञा केली पा॥ विशेष. कृपा करून पत्र पा॥ तें पावलें. वाचून परम संतोष जाहाला. ऐसेंच निरंतर पत्रीं सांभाळ करीत जावा. याजउपरी पत्रीं स्वाराचा मजकूर लिहिला येसीयासी श्रीमंत राजश्री बाबानींही पत्र लि॥ होतें कीं कुसाजी बोरवडे व तुम्ही मिळून स्वार ठेवणें. त्यास आम्हीही तुमच्या पत्रापूर्वी कुसाजी बोरवडे याजला लि॥ होतें. त्याणेही करार केलाच आहे आण आम्हीही त्याजला हलीं लिहिलेंच आहे. कुसाजी बोराडे हिंगणीस आहेत. त्याजकडे तुम्ही जासूद पाठऊन त्याजला ल्याहावें कीं तुम्ही व त्र्यंबकजी नाईक येका जागा होऊन स्वार ठेवणें. म्हणजे तो आलियावरी स्वाराची तजवीज होईल. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपावृधि कीजे हे विनंती.

असल पत्र छ ३ रबिलावलीं कुसाजी बोरवडे याजकडे पा॥ कार्तिक सुध ५.

लेखांक ७५ तारीख २६-११-१७५७

श्री

चिरंजींव राजश्री माधवराव पवार विस्वासराव यांसी प्रती येशवंतराव पवार आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. तेथें सर्व मजकूर

लिहिला तो ध्यानास आला. सरंजामाचा व का। नांदूर येथील लिहिलें कीं श्रीमंता कडील मामलेदार व पागा ऐसे उपद्रव करितात हा सर्व अर्थ ध्यानास आला. येशास राजश्री विसाजीपंत येथें होते त्यास सर्व ताकीदपत्रें घेतलीं. याजवर सर्व मोकलें होईल. अमल ताकीदपत्राप्रमाणें चालल. पंतमशारनिले आमचा निरोप घेऊन तुम्हाकडे आले आहेत. त्याची भेट जाली असेल. सर्व वर्तमान सांगतील त्यावरून कलों येईल. वरकड अर्थ तर तुमची आमची भेटही सत्वरच होईल तेव्हां परस्पर सर्व वर्तमान कलों येईल. विचारें विचारें सर्व घडोन येईल. दुसरे चिंतांत न आणावें. रा। छ १३ रबिलावल. बहुत काय लिहिणें हे आसीर्वाद

मोर्तब
सुद

लेखांक ७८ माहे नोव्हेंबर १७५७

श्री

श्रीमंत राजश्री माधवराऊ पंवार
विस्वासराऊ साहेबांचे शेवेसी

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्ये रनो कुसाजी बोरवडे दंडवत विनंती उपरी. साहेबी अज्ञापत्र लिहिलें कीं, श्रीमंत राजश्री बाबाही तुम्हाकडून हिशाचे राऊत चाकरीस देविले आहेत. त्याची तजवीज करून पाठऊन देणें. त्यास पूर्वीं आपणास व त्रिंबक नाईक यांस लिहिलें होतें. हलीं दुसरें पत्र त्रिंबक नायेकासच अखत्यारीणे लिहिलें आहे. ते तेथें राऊत ठेविले असतील त्यास तुम्ही आपले ताकीदपत्र लिहिणें. ते राऊत आपणाकडे पाठवितील. आपणास साहा राऊताची परवानगी देविली आहे. तेही नालबंदी मात्र देणें म्हणोन लिहिलें आहे. तुम्ही खावंद. ज्याप्रा।

अज्ञा कराल त्याप्रा। शेवकाणी वर्तावें. साहेबास कळावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

लेखांक ७७ तारीख १७-१२-१७५७

श्री

चिरंजीव राजश्री माधवराव पवार विस्वासराव यांसी येशवंतराव पवार आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला अभिप्राय कळों आला. व मौजे वरवडी येथील पेसजीची सनद पाठविली. सर्व ध्यानास आलें. यैशास या वांटणी पुरातन आहेत. त्यास वरवडीचा यैवज मुबदला काय केला असेल हें न कळें, तर जेथें मुबदला असेल तेथें द्यावा. वरकड वांटणींत घालमेल करावी यैसे नाहीं. त्याहीमध्यें समाइकांचा विचार नव्हें. आमचे वांटणींत आहे ते गांवविसी आपण हरघडी ल्याहावें यैसें नाहीं. व कितेक रा। भिकाजी नाईक याही का। नांदुराविसी सांगितलें. यास लस्करांत याल अथवा राजश्री विसाजीपंत येतील मग जें बोलनें कर्तव्य तें केलें जाईल. रा। छ ५ रबिलाकर. बहुत काय लिहिणें हे आसावार्द

मोर्तब
सूद

लेखांक ७८ इ. स. १७५७-५८

श्री

यादी सरंजाम माधवराव पंवार विस्वासराव अज सरंजामापैकीं वजा जगजीवन पंवार तक्षीम बाकी दोन तक्षीमा मारनिले हिसे माहालानिहाये.

सुा समान खमसैन मया व अल्फ.   माहाल.

× × × ×

लेखांक ७९   इ. स. १७५७-५८

श्री

तेरीज सरंजाम जगजीवनराव पंवार विश्वासराव पौ चौ सुा समान खमसैन मया व अल्फ.

	अकार सन सबा सो	वसूल निा मोकासी	वसूल सरकार निा कमाविसदार
पाा धुले	३७२७	३७२७	०
पाा चालीसगांव	१६१८॥।-॥	३५०	१२६८॥।-॥
पाा झोडगे	४१४।	१६४	२५०
ताा वाघलीबारे	६१॥	६१॥	०
पाा कोतुल	३७५	३२५	५०
पाा सातारे	३६९।≡॥	३६९।≡॥	०
फुट मोकासे गांव याची चौकसी करणें असे अदमासे बेरीज	३५००	३११८	३८२
पाा नासिक	७५००	५३५०	२१५०
ताा देवपूर बेलापूर	५७१०॥।=	९६६८=	४७४४॥।
हवेली संगमनेर	७५१३८≡	३९९५।	३५१७॥।≡
पाा कुंभारी	१८२०	७६०॥	१०५९॥
सेवगांव जकातसुधा	४५५१।	५८७।	३९६४

जकात पा। संगमनेर	९००	९००	०
बारागांव नांदुर	११००	११००	०
मौजे दोडीता देवपूर	५५०	•	५५०
पा संगमनेर नि।।			
जिवाजीपंत अपा			
१५	३९७११।ー।	२१७७४।ー॥	१७९३६॥।≡॥

फुट मुकासे गांवची बेरीज पस्तीसशे लि।। असे त्याची चौकसीमुळें कमजादा होईल तें लिहिणें असें

पो खर्च मजुरा दिल्हा

१०० घोंडभट पुराणिक मौजे गंगापूर पा। नासीक

१२०० रंगो त्रिंबक मजमदार

१०५० पा संगमनेर पो

९०० जकात पा मा।

५० मजमु प्रा। मार

१०० खाडगांव

१०५०

१५० मौजे सेवगांव पा नासिक

१२००

५८३५ माहाल मजकूर

७१३५

बाकी मोकासी याजकडील यैवज साल मजकुरीं सरकारांत घेणें रुपये १४६३९।ー॥

लेखांक ८०. इ. स. १७५७–५८

श्री

तेरीज येकंदर सरंजाम दारकोजी पंवार दहक व विस्वासराव पैकीं.

सुा समान खमसैन मया अलफ.

छ	आकार सन सबा	सन आर्बा रुपये	वसूल रुपये	बाकी रुपये	जाजती रुपये	कसर सन सबा रुपये	जाजती सन आर्बा रुपये
विस्वासरावपैकीं	१३६८४।।।=।।।	११३७४।।।‐।।	११२१६।।≡।।।	५२७८≡	३६९८=।	२३५३।।।≡।	४३।।।‐
दहक सरंजाम	४१५७२।।।=।।।	३१८१५।।=।।	३८३४८।।=।।	०	६५८३	९८५७	९९।।।≡
	५५२५७।।।‐।।	४३१९०।≡	४९५६५।=।	५२७८≡	६९५२८=।	१२२१०।।।≡।	१४३।।।°

लेखांक ८१

इ. स. १७५७-५८

तेरीज सरंजाम दारकोजी पंवार व चंदरराव पंवार व मानाजी पंवार सरंजाम दहक

निा बाळजी भोसले. सुा समान खमसैन मया व अलफ.

छ	आकार सन सबा	सन आर्बा	वसूल रुपये	बाकी रुपये	जाजती रुपये	कसर सन सबा	जाजती रुपये
पा गालणा निमे	५८२६	४१९०	४१९०	०	०	१६३६	०
देखील जकात							
पा बाहाल निमे	२०००	२०००	२०००	०	०	०	०
पा अंबे निमे	६००	६००	६००	०	०	०	०
कुसरावद पाौ वगात	३५००	३५००	३५००	०	०	०	०
खरगोण गुतका							
पिपलगांव पा चाकण	१००	१००	१००	०	०	०	०
सरकारपैकीं मुकासा	४००	४००	४०	०	०	०	०
सरदेशमुखी मौजे							
कोथले पा कर्डे	१२४२६	१०७९०	१०७९०	०	०	१६३६	०

लेखांक ८२ तारीख २२-१-१७५८

श्री

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री कृष्णाजी विस्वनाथ गोसावी यांसी

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुा समान खमसेन मया व आलफ. रा माधवराव पवार विस्वासराव याच्या कुल सरंजामावर राजश्री पंत सचीव यांजकडील सावोत्रियाचा गुतका पेशजीपासून आहे त्याप्रों सनमजकुरीं सरकारांतून सावोत्रियाचा येवज नेमून दिल्हा बिा

६५० मशारनिले

३२५ जगजीवनराव पवार

३३९ दारकोजी पवार व चंदरराव पवार

११३ मशारनिले

११३ येशवंतराव पवार

११३ गोविंदराव पंवार

३३९

१३१४

येकूण येक हजार तीनसे चवदा रुपये करार करून दिल्हे असेत त्याप्रमाणें मोकासी रा पंतमशारनिलेस पावते करतील. तुह्मी त्याचे माहालास सावोत्रियाविसी दखलगिरी न करणें. राजश्री पंतमशारनिले-कडील कोणी तगादा करील त्यासही तगादा करूं न देणें. जाणिजे. छ ११ जमादिलोवल. आज्ञा प्रमाण.

लेखन
सीमा

लेखांक ८३ तारीख ३१-१-१७५८

श्री

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी
अलंकृत राजमान्य राजश्री सदासिव
पंडित स्वामी गोसावी यांसी

पोष्य बालाजी बाजीराऊ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित असलें पाहिजे विशेष. रा माधवराव पवार विस्वासराव याच्या सरंजामाचे माहाल आहेत त्याजवर तुह्माकडील साबोत्रियाचा करार सालमजकुरापासून रुपये

६५०	खुद मशारनिले
११३	दारकोजी पवार चंदरराव पवार
११३	येशवंतराव पवार
११३	गोविंदराव पवार
३२५	जगजीवन पवार
१३१४	

येकूण यक हजार तीनशें चौदा रुपये करार केले असेत. याप्रमाणें घेत जावे. रा छ २० जोवल सुा समान खमसेन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

लेखांक ८४ तारीख १५-१०-१७५८

श्री

राजश्री माधवराव पोवार वि
स्वासराव गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो। बाबुराव सदासिव आसिर्वाद. सुा तिसा खमसेन मया अलफ स्वारीस जावयाची श्रीमंताची आज्ञा जाली

आहे. तरी तुम्ही आपले लोकासुधा पत्रदर्शनीं स्वार होऊन येणें. येक क्षण विलंब न करणें. छ १२ माहे सफर. बहुत काय लिहिणें हे आसीर्वाद

मोर्तब सुद

लेखांक ८९ तारीख १०-१२-१७५८

श्री

राजश्री माधवराव पवार वि
स्वासराव गोसावी यांसी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रीा कृष्णाजी मोरेस्वर व बालाजी कृष्ण कमाविसदार जकात प्रां कल्याण भिवंडी रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे दस्तक दोनसे बैलाचे सालमजकुरीं घेऊन कल्याण भिवंडी प्रांते भरावयासी पाठविले आहेत त्यास तुमचे कारकुनानीं आडथला केला आहे म्हणून लिहिलें. त्यास तुमचे दस्तक सुदामत मनास आणितां आठ नव वरसाचा शोध केला परंतु आपले दस्तक येवून बैल भरोन गेले असा दाखला कोठें पुरत नाहीं. तेव्हां नवें दस्तकसे कळलें. त्यास नवे दस्तक श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीची आज्ञापत्र कीं या दस्तकाचा भोगवटा आठ वर्षे नाहीं. सालमजकुरीं दस्तक चालवावयाची आज्ञा केली आहे तर दस्तक चालवणें. याप्रों सनद आल्याविना दस्तकी बैल जाऊं द्याव-यासी कार्यास न ये. त्यास याप्रों येविसीं हुजुरचें आज्ञापत्र आणऊन

पाठवावें म्हणजे सुरलितपणें आपले दस्तक चालेल. रा छ ८ राखर बहुत काये लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती

मोर्तब
सुद

लेखांक ८६ — तारीख १७-१२-१७५८

श्री

राजश्री माधवराव प
वार गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री त्रिंबकराव सदाशिव * आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जावें विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. आम्हीं स्वार होऊन गणेगांवास आलों. तेथें परस्पर ऐकिलें कीं आपण नासिकाचे रोखें गेलें, तहकीक कळलें नाहीं, तरी लिहिलें पाहिजे म्हणून लिा तें कळलें. येथ्यास अज मुकाम घाटमाथा मढावरी आहे. उदेक कूच करून मालसेजेच्या घाटें उतरून दरकूच वज्रजोगणीस जाणार. तरी तुम्ही स्वार होऊन जलदीनें याच मार्गें येऊन पोहचणें. अगर जवल असल त्या मार्गें लौकर येणें. रा छ १५ रविलाखर. बहुत काय लिहिणें हे विनंती.

लेखांक ८७ — इ. स. १७५८

श्रीशंकर

श्री सहश्राये चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्री माधवराऊ पंवार विश्वासराऊ यासी प्रती जगजीवनराऊ पंवार कृतानेक आसीवार्द

* त्रिंबकराव सदाशिव पुरंदरे.

विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. पत्र पाठविलें तें पावोन वर्तमान श्रृत जालें. मोहिमेच्या रावताविसी लिहिलें येसियासी तुम्हीं आम्हीं पुणियांत असतांना रूबरू हा तह जाला जे आमच्या पथकाचे स्वाराहीं स्वतंत्र हुजुर चाकरी करावी. यैसा करार असतां तुम्हीं स्वाराचे लिहिलेत हें अपूर्व गोष्ट आहे. आम्हीं तों आपले स्वार पूर्वींच श्रीमंताकडे चाकरीस पाठविले आहेत. अतःपर तुम्ही आम्हांस लिहावें येसा अर्थ नाहीं. लस्करचेजवळ विशेष वर्तमान होईल ते वरचेवर लिहित जाणें. विशेष + + कृपा लोभ असो देणें हे आसीर्वाद.

लेखांक ८८ इ. स. १७५८

श्रीशंकर

श्री सहश्रायु चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्री माधवराऊ पवार विस्वासराऊ यांसी प्रती जगजीवनराऊ पवार आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिलें पाहिजे विशेष. पत्र पाठविलें तें पावोन वर्तमान श्रुत जाहालें. साहोत्रियाचे ताकीदपत्राविसी लिहिलें येसियास खानदेशचे कमाविसदारास येथें आणविले आहेत. ते लौकरीच येतील आणि त्यास ताकीद करून रुपये देवऊन पा। नासिक पा। सेवगाऊ या कमाविसदारास ताकिदी लिहून दिल्या आहेत विशेष. आम्हींही या प्रांते लौकरीच येणार आहो. तिकडे आलिया उपरी तुमची आमची भेटी होईल. भेटीनंतर परस्पर वर्तमान कळों येईल. आपल्याकडील सर्वदा कुशल वृत लिहून पाठवित जाणें. विशेष काय लिहिणें लोभ आसो दीजे हे आसीर्वाद

मोर्तब
सुद

लेखांक ८९ तारीख १२-२-१७५९

पे. रो. रु. ५७

स्वारी राजश्री पंत प्रधान. सुा तिसा (खमसैन) माहे जमादिलाखर विा राजश्री त्रिंबक सदाशिव मो पापडी नजीक वसई.

छ १३ जमादिलाखर रवासुदगी

७४२ माधवराव पवार विस्वासराव यासी स्वार १६६ योा
रोजमुरा आठवडा रुो ३७१ इा छ १३ जाखर
ताा छ ३ रजब आठवडे २ योा रुपये

कृष्णाजी अनंत फौजा सुरतेस रवाना केल्या त्यास रोजमुरेबा.

छ १४ जमादिलाखर (तारीख १३-२-१७५९)

माधवराव पवार विश्वासराव + +
सहवर्तमान तुम्हाकडे पाठविले त्यास स्वार १६६ यकसे सासष्ट + + ची गणती घेऊन रोजमरा आठवडा रुपये ३७१ तीनसे येकाहत्तर रुपये देत जाणें..........
याखेरीज मारनिलेकडील स्वार ९ नऊ येतील त्याची गणती घेऊन स्वारी रुपये २। सवादोनप्रोा देत जाणें म्हणून कृष्णाजी अनंत यास सनद.

लेखांक ९० तारीख २८-१०-१७६०

श्री

राजश्री भवानी मामाजी काा दार
जकात नांदूर गोसावी यासी

श्नो माधवराव पंवार विस्वासराव. सुा सन इहिदे सितैन मया आलफ. तुम्हाकडून जकात मार सालगुाचा यैवज येणें त्यापैकीं

परसराम बेलदार यासी रु॥ १५ पंधरा देविले आहे ते देणें. छ १८ माहे राखोवल.

मार्तब सुद

लेखांक ९१ तारीख १४-३-१७६१

पो छ २६ रमजान चैत्र वद्य १२

श्री

राजश्री माधवराव पवार विस्वासराव

गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नो॥ बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद. सुहुर सन इहिदे सितैन मया व आलफ. तुह्माकडील दिवाणगिरीची आसामी राजश्री बाबुराव हरी याजकडे आहे. त्यास वेतन रुपये ५०० पांचशें सुदामत आहे. त्यापैकीं रुपये २५० आडीचशाची खेडी दोन व रुपये १५० दीडशाची पा॥ वाटून येथील मुकासबाबचे यैवजी सालाबाद नेमून दिल्हे आहेत व दीडशे रुपयाची पा॥ ललिंग येथील मुकासबाबपैकीं वरात सुदामत आहे त्याप्रों पावायाची ताकीद जाली पाहिजे ह्मणून मशारनिलेनीं विदित केलें. त्याजवरून पत्र सादर केलें असे. तरी सदरहुपैकीं मशारनिलेस नेमणूक तुह्मांकडून वरात व खेडी सालाबाद आसल त्याप्रों येवज मशारनीलेस पाववणे व याची बाकी साल गुदस्ता व तिगस्ता आसेल तेहि वाजबी देणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ ६ साबान.

श्री
राजा शाहू नर
पति हर्ष निधान
बाळाजी बाजी
राव प्रधान

लेखन
सीमा

लेखांक ९२ तारीख ६-७-१७६१

श्री

राजश्री माधवराव पवार विस्वा

सराव गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो आबुराव सदासिव आसीर्व्राद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणें विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. आपण पुणियास कधीं जाणार, अह्मीं कधीं यावें तें ल्यावें ह्मणोन लिहिलें ऐसीयास श्रीमंतास देवाज्ञा जाली याचें वर्तमान येतांच आह्मीं येथें आलों. तुह्मीही वर्तमान कळतांच यावयाचें होतें. प्रस्तुत श्रीमंत उभयेतां उदईक स्वार होऊन सातारियास जाणार. तिकडोन फिरोन पुणियास आलियावर तुह्मी येणें. जाणिजे. छ ३ जिल्हेज. बहुत काये लिहिणें.

लेखांक ९३ इ. स. १७६१-६२

श्री

यादी विस्वासराईच्या सरंजामाबद्दल येवज राजश्री जिवाजी पवार याजकडे ई॥ सन ११६३ ता॥ सन ११७१ सु॥ इसने सितैन रुो

४८००० श्रीमंत राजश्री पंत प्रधान यानीं सन ११६३
सु॥ आर्बामधें मोकासियाची तहदर सदेखेरीज
सरदेशमुखी रुपये २२॥ साडे बावीस करून
देवून चाकरीस राऊत १०० शंभर नेमून
दिल्हे त्याप्रमाणें रा॥ माधवराव पंवार विस्वास-
राव याणी सदरहूप्रा॥ स्वार बालगून चाकरी

केली. इा ता सन ११६६ सुा सबान साले ४ त्यास जिवाजी पंवार याणी हिसियाचे राऊत चाकरीस द्यावे ते दिल्हे नाहींत. आण सरंजाम तरी खात आले. दरसाल कमजादा रुपये १२०००

२६२५० सन ११६७ सुा सन समानांत सरंजामाचा आकार श्रीमंतानीं आणविला विद्यमान राजश्री बालाजी महादेव मांडवगणे रुपये ६४८६१ पैकीं सरदारीस खर्चास ऐवज नेमून दिल्हा रुपये २१००० राहिल्या ऐवजास राऊत चाकरीस नेमून दिल्हे.

१७५ ईा सन ११६७ ता सन ११७० साले ४ दरसाल

२२५ सन ११७१ मधें येणे प्रों करार करारा प्राा हिसियाचे राऊत साल दरसाल राजश्री जिवाजी पवार याणी चाकरीस देत आले; परंतु सरदारीचा ऐवज आजी बाद केला त्याचा वांटा द्यावा आगर खाशानें चाकरीस यावें त्यास खासा चाकरीस कोण्ही आलें नाहींत सबब सरदारीच्या ऐवजाची वाटणी दरसाल रुपये ५२५० येकूण साले ५

७४२५०

लेखांक ९४ इ. स. १७६१-६२

श्री

सहस्रायु चिरंजीव विजईभव राजश्री माधोराव
पंवार विस्वासराऊ यांसी

प्रत्य जिवाजी पंवार कृतानेक आा उपरी. तुम्ही श्रीमंताचें पत्र स्वकीयें पाठविलें तें पावोन अभिप्राय ध्यानास आला. त्यांत परिहार फारसा लिहिला. तरी येविसी तुम्हास विशेष हलहल लागली आसली तरी उतमच आहे. आपाजीपंताचा बहाणा करावयास प्रयोजन नाहीं. हलीं कृष्णाजीपंत फडनीस घरास गेले आहेत ते आल्यावर आह्मी आपल्या-कडील हिसेब लेहोन काढवितो आणि तुम्ही तो काढिलाच असेल. कोणे गोष्टीचा हलहल न करावी. श्रीमंतांही बोलाविलें तरी सडेच तर्‍हीं जावून भेट घेणें लागेल. जावें. आपण तो राजश्री बाजीपंताचा मार्ग पाहातो. त्यांचा जाब जैसा येईल त्याप्रमाणें आपणही येऊं. परंतु तुम्ही स्वार पुढें होऊन जाणें. अगत्य फारसी असली तरी सत्वर जाणें. लोकांचा मार्ग पाहावा तरी सरंजाम सत्वर व्हावयास दिवसगत लागेल. यास्तव लिहिलें आहे. प्रसंगानुसार विचारून कर्तव्य तें करावें. बहुत काय लिहिणें हा आसीर्वाद.

मोर्तब
सुद

लेखांक ९५ इ. स. १७६१-६२

श्री

चिरंजीव राजमान्ये राजेश्री माधोराव पंवार विस्वासराव यासी प्रती जिवाजी पंवार आसीर्वाद उपर. तुम्हास एकदोन पत्रें आम्हीं पाठविलीं.

त्याचें उत्तर कांहीं न आलें. त्यासी पूर्वी हिशोब पाठविला आहे तो पाहेलाच असेल. त्यासी आमचे रुपये हिशोबीं निघतात ते देणें आनि आपले हमीरपुरचें गांव वांटून घेणें. आतां गुता न ठेवणें मोहगम कार्याचें नाहीं. तुह्मास कांहीं सवशये आसला तर आपला शाहना कारकुन पाठऊन देणें. आतां मोहगम गोस्ट हें न ठेवणें. उतर पाटवणें. हा आसीर्वाद.

मोर्तब सुद

लेखांक ९८ इ. स. १७६१-६२

श्री

चिरंजीव राजश्री मायोराव पंवार विस्वासराव यांसी प्रति जिवाजी पंवार आसीर्वाद उपर. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. त्यांत मजकूर तुम्हीं लिहिला कीं आमचे हमीरपूरचा हिशाचे गांव वाटून द्यावे म्हणून लिहिलें. त्यासी येविशई पूर्वी राजश्री खंडो कान्होस आपण सांगितलें होतें कीं, आमचा ऐवज खर्च जाला आहे तो देणें व राऊत चाकरीस देणें आणि आपला हमीरपूरचा वाटा घेणें त्यासी आतां आपल्यास स्मरण जालें बहुत उत्तम आहे. त्याजवरून आपण हिशोबाची याद पाठविली आहे हें पाहून आमचा ऐवज फाजील तुम्हाकडे पडला आहे तो पाटवून द्यावा आनि आपला वाटा घेणें. त्यासी हें आमचे चितांतच होतें त्याही मधें लेहून आपण पाठविलें तर उतमच आहे. विलंब या गोस्टीस न करणें. आपला फर्च्या करणें आनि आमचा ऐवज निघतो तुम्हाकडे तो वाट करून देणें. याचें उत्तर सत्वर पाठवणें. तुमचे तोंडावाटें गोस्ट निघाली

तर विलंब न करणें आम्हास आतां राह्यास आणकूल पडत नाहीं. बहुत काय लिहिणें. आपला येखत्यारी आसल कारकून त्यास पाठवणें. हा आसीर्वाद.

मोर्तब सुद

लेखांक ९७

इ. स. १७६१–६२

श्री

राजश्री आपाजी हरी कमावि

सदार गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो माधवराव पंवार विस्वासराव दंडवत. सुा इसने सितैन मया व आलफ. श्रीमंताची स्वारी निघावयाची त्वरा आहे. आम्हांस आपले जमावाची तयारी केली पाहिजे. त्यास येवज पाही (पुढील मजकूर फाटलेला)

\+ \+ \+ \+ \+ \+

पाहिजे. याची तजबीज करून पैका पाठऊन देणें. तुम्हास रूबरू सांगितलें आहे. तरी लिहिल्याप्रमाणें पैका करून घेऊन येणें +

लेखांक ९८

तारीख १६-१-१७६३

श्री

राजमान्य राजश्री भिकाजी कृ

ष्ण कामदार पाा सातारे दिाा गोविं

द दीक्षित गोसावी यासी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुाा सलास सितैन मया व अलफ. पाा मजकूर निमे मुकासा जकातीसुधां राजश्री माधवराव पवार

विश्वासराव याजकडे पेशजीपासोन फौजेस सरंजाम आहे त्याप्रमाणें करार असे. जप्ती सालमजकूर केली होती ते मोकळी केली असे. तरी जप्तीमुळें वसूल घेतला असल तो रयेतीस सरकारचे ऐवजी मजरा देणें. मुकासियाचे ऐवजांत न धरणें. मुकासियाचा ऐवज वाजवी जमाबंदी होईल तो त्याचा त्यास देणें. जप्तीचे वसुलाची वाटणी याजवर न घालणें. याचा अमल याजकडे सुदामत तहाप्रमाणें सुरलित चालवणें. जाणिजे. छ १ रजेब. आज्ञा प्रमाण.

लेखन
सीमा

लेखांक ९९ तारीख ३१-१-१७६३

श्री

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री

नारो शंकर राजे बाहदर स्वामी गोसावी यांसी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणें विशेष. ता॥ बेलापूर पा॥ संगमनेर येथील मुकासबाबेचा हिसा राजश्री माधवराव पंवार विस्वासराव यांजकडे पेसजीपासोन आहे त्यास तो मजकुरपैकीं जागिरीचे चालीसगांव तुम्हांस सरंजाम दिल्हा त्याचा मुकासबाबेचा ऐवज मशारनिल्हे + + + देणें म्हणून आलाहिदा पत्र सादर आहे. सदरहू तुम्हाकडील सरंजामखेरीज ता॥ मारचे गांव तुम्हांकडे जप्तीस होते त्याविसी हालीं पत्र सादर केलें असे. तरी तुम्ही वसूल जप्तीमुळें यांजकडील मुकाशाचा घेतला आहे त्यापैकीं याचे मुकासबाबेचा ऐवज वाजवी तहाप्रमाणें होईल तो यांचा

यांस देणें. जाणिजे. छ १६ रजब सुा सलास सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

बार

लेखांक १०० तारीख ९-८-१७६४

श्री

राजश्री दीपसिंग दिा पागा
गोसावी यांसी

स्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुा खमस सितैन मया व अलफ. राजश्री माधवराव पंवार विस्वासराव याजकडे पाा बारागांव नांदूर मुकासा पेसजीपासोन आहे त्यापासोन काे मारचीं कुरणें बागनली व बानलिंग व वरवंड वाटेचा डोंगर पलसदऱ्यापासोन हांडेश्वरापावेतों होती. यांपैकीं बागनली व बानलिंग हे दोन्हीं कुरणें पहिलीं सरकारांत पागेकडे घेतलीं. बाकी वरवंड वाटेचा डोंगर पलसदऱ्यापासोन हांडेश्वरापावेतों याची त्याजकडे समशेर बहादुर याचे कारकीर्दीत चालत आली आहेत त्याप्रमाणें राखीत असतां तुम्हांकडील पागेचे उपसर्ग करवितात. गवते नेतात. कलागती करितात. याजकरितां ताकीद करावी म्हणोन याणीं विदित केलें. तरी सदरहु कुरणें याजकडे सुदामत चालते व याजप्रोंच हालीं पणी राखिलें असतां पागेचे लोकांनीं खटखट करावयास दरकार काय. तुम्हीं त्यास ताकीद करणें. सुदामत चालत असेल त्याप्रमाणें चालवणें. बोभाट येऊं न देणें. जाणिजे छ. १० सफर आज्ञा प्रमाण.

लेखन
सीमा

लेखांक १०१ तारीख ५-९-१७६५

श्री

राजश्री माधवराव पवार विस्वासराव

गोसावी यासी

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य श्मो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुा सीत सितैन मया व अलफ. कसबे बारागांव नांदूर या गांवचें जुनें गांवठाण मोडून नवें गांवठाण वसवलें. त्यास पंधरा सतरा वर्षें जालीं व सालमजकुरीं यादो पांडुरंग यानीं नवें कुसु जुन्या गांवांत घातलें तें पाडिलें म्हणून हुजूर विदित जालें त्यास जुना गांव मोडून नवा गांव वसविला कसकसा व कुसु पाडावयास कारण काये हें मनास आणावें लागतें, तरी येविसी साधन तुम्हापासी काये असेल तें घेऊन हुजूर येणें. जाणिजे. छ १८ रावल बहुत काये लिहणें

श्री ०
राजा राम नरप
ती हर्षनिधान माध
वराव बल्लाळ मु
ख्य प्रधान

लेखन
सीमा

लेखांक १०२ तारीख २३-१-१७६७

श्रीमार्तंड

राजश्री केशवराव शंकर कमाविस

दार संगमनेरकर गोसावी यांसी

श्मो माधवराव पोवार विस्वासराव. सुा सबा सितैन मया अलफ. देणें घनशाम भोई पालखी निा रा विसाजीपंत दिवाण रोजमुरा पौष

मासचा रुा २५ पंचवीस तुम्हाकडील माहालच्या यैवजी देविले आहेत. कबज घेऊन देणें. जाणिजे. रा छ २२ माहे साबान

मोर्तब
सुद

बार

लेखांक १०३ तारीख १८-७-१७६७

पौ छ २६ माहे सफर

श्री

राजश्री माधवराव पवार

विश्वासराव गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुा समान सितैन मया व अलफ. तुमचें प्रयोजन आहे तरी पत्रदर्शनीं स्वार होऊन भेटीस येणें. देवास जाऊन मग येऊं म्हणाल तर कार्याचें नाहीं. अगोधर हुजुर येणें. तुम्ही अपले घरीं आला म्हणोन कळलें. उत्तम आहे. तरी भेटीस येणें. विलंब न करणें. जाणिजे. छ २१ सफर. बहुत काय लिहिणें

लेखन
सीमा

— श्री ०
राजा राम नरप
ती हर्षनिधान माध
वराव बल्लाळ मु
ख्य प्रधान

लेखांक १०४ तारीख २१-१२-१७६७

श्री

राजश्री जाखोपंत गोसावी

यांसी

छ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो माधवराव पंवार विस्वासराव दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिा आसावें विशेष. आह्मी व राजश्री विसाजीपंत पुण्यांत आसतां तुह्मी सुपियासी (पेदा पा) + + + आहे तो घरी खटखट कारितो. त्यास येथें पुण्यांत राजश्री त्रिंबकपंत व राजश्री राघोपंत आहेत त्यांनीं आह्मास ऐवजाचें मागणें केलें. त्यासी आह्मी करार केला आहे कीं, दरबारचे कामकाज कागदापत्राचे उरकलियावर तुमचा फडशा करूं तेव्हां येथून जाऊं. आह्मास तुमच्या देणियाची कालजी बहुत आहे. त्यावरून तूर्त सुपियांत तुमचा पेदा बसला आहे. त्याजला मनाई चिठी द्यावयाविसी राजश्री त्रिंबकपंतानीं राजश्री राघोपंताचें पत्र तुह्मास लिा आहे. आनमान न करिता पेद्यास मनाई चिठी द्यावी. आह्मी तुमच्या देणियाचा निर्गम केलियाखेरीज येथून जात नाहीं. कललें पाहिजे. बहुत काय लिहिणें. छ. २९ रजब हे विनंती

श्री राजाराम छत्र प ति चरणी दृढ भा व बुबाजी सुत माधवराव पवा र विस्वासराव

मोर्तब सुद

स्वामीचे सेवेसी विसाजी गंगाधर साष्टांग नमस्कार विनंती उपरी. तुह्मी कर्जाचे ऐवजाबद्दल सुपियासी माणूस पा ह्मणून कललें. त्यास राजश्री माधवराव पंवार विस्वासराव व आह्मी पुण्यांत आहोंत. तुमच्या देणियाचा फडशा येथें राजश्री त्रिंबकपंतापासी करतील तेव्हां येथून जातील.

चिंता न करणें. तूर्त पेद्यास मनाई चिठी द्यावी. येविसी तुह्मास त्रिंबकपंत सुभेदार यानीं व राजश्री राघोपंतानीं पत्र लिा आहे त्यावरून कळेल.

लेखांक १०५ इ. सं. १७६७-६८

श्री

झडती सरकार राजश्री माधवराव पवार विस्वासराव माहालानी ताा बेलापूर व ताा देवपूर प्राा संगमनेर. सुाा समान सितैन मया व अलफ सन ११७७ विाा विसाजी लाड कमाविसदार ईाा मृगसाल ताा अखेरसाल

जमा रुपये

५७६३॥-

ताा

ऐन जमा रुपये सिवाये जमा रुपये

५७१०॥- ५३

यासी माहाल

३६८२८- ताा बेलापुर

२०८१॥· ताा देवपूर

५७६३॥-

ताा

ताा बेलापूर

१९६० निाा सखाराम भगवंत अलाळ हिसेब वसूल

१ मौजे कोम्हार बुाा १ मौजे राजन खोल

१ मौजे भगवतीपूर १ मौजे केडगांव

१ मौजे ममदापूर — २

— ३

५

यासी वसूल मा। हरिपंत का। दार

१२३॥· मौजे ह्यानवत गांव नि।। अपाजी मुंढे अलाल हिसेब वसूल

१०७।< मौजे मोहगांव

१०५।< यैन

२ भेटचिटी

१०७।<

१२२ मौजे तिलापूर नि।। रामाजी बावा चिटणीस अलाल हिसेब वसूल

४७॥ मौजे फल्याबाज नि।। बालाजी केशव अलाल हिसेब वसूल

७५१ मौजे पढेगांव नि।। मोरो विनायक अलाल हिसेब वसूल

५७०॥। का। बेलापूर बु।। नि।। नारो शंकर अलाल हिसेब वसूल

३६८२८<

ऐन जमा	रुपये	सिवाये जमा	रुपये
	३६८०८=		२

ता। देवपूर

२१९।= मौजे मुसलगांव निमे ता। सिरसाट

२१३।= यैन

६ सिवाय

२ भेटचिटी

१ बकरे

३ राबता माहार

६

२१९।=

५५। मौजे मानोरी

५३। यैन

२ भेटचिटी

० राबता माहार लावनीनवीस

५५।

६४ मौजे गुळापूर

६१ यैन

३ सिवाय

२ भेटचिटी

१ बकरे

० राबता गांवास नाहीं

३

६४

१०९॥॰ मौजे पारगांव खुर्द

१०६॥ यैन

३ सिवाये

२ भेटचिटी

१ बकरे

० राबता येणें

३

१०९॥॰

१५९८= मौजे पिंपळे

१५२८= यैन

७ सिवाये

२ भेटचिटी

१ बकरे

४ राबता माहार

७

१५९८=

१०९८≡ मौजे दहिवाडी

१०३८≡ यैन

६ सिवाय

२ भेटचिटी

१ बकरे

३ राबता माहार

६

१०९८≡

८५७ मौजे पंचाल सुलतानपूर देह २

८४६ यैन

११ सिवाये

४ भेटचिटी

१ बकरे

६ राबता माहार

११

८५७

४८।॥· मौजे शाहापूर खुर्द

४५।॥· यैन

३ सिवाये

२ भेटचिटी

१ बकरे

० राबता माहार गांवास नाहीं

३

४८।॥·

९०।- मौजे धरनगांव

८७।- यैन

३ सिवाय

२ भेटचिटी

१ बकरे

० राबता माहार येणें

३

९०।-

२८२ मौजे पारेगांव बुा

२७८ यैन

४ सिवाये

० भेटचिटी जमा वसूल होणें

४ राबता माहार

४

२८२

८७ मौजे माहाजनपूर

८४ यैन

३ सिवाये

२ भेटचिटी

१ बकरे

० राबता गांवास नाहीं

३

८७

२०८१॥।

ता

यैन जमा	रुपये	सिवाये जमा	रुपये
	२०३०॥।		५१

तेरीज एकंदर माहालानी रुपये

	अज	यैन जमा रुपये	सिवाये जमा रुपये
ता बेलापूर			
देहे ११	३६८२८	३६८०८	२

ता देवपूर

देह ११॥ २०८१॥ २०३०॥ ५१

५७६३॥- ५७१०॥- ५३

खर्च रुपये

४३५ बद्दल मुशाहिरे कारकून नेमणूक बा

३७५ रा विसाजीपंत दिवाण

५० फडणीस बाबुराव

१० गंगाधरपंत सिकेनीस

४३५

२५ धर्मादाव वर्षासन मनोहरशास्त्री बिन नीलकंठशास्त्री तेलंग वास्तव्य कल्यापूर प्रांत बोदन बरहुकुम नेमणूक

३७९ माहाल मजकूर

२१० कमाविसदार

२०० वेतन

१० सिरपाव

२१०

७३ रंगोपंत मजमदार

७५ सिवबंदी

५ कोरे कागद

१६ मशालची नि॥ कादार

३७९

५४ माहालमुलें खर्च

१४ सखाराम भगवंत याजकडील कारकून त्र्यंबक-

पंत राजुरीकर यास सेलापागोटे दिल्हें सबब. श्रीमंत दादासाहेब यांची गर्दी जाली. यैवज देत नव्हते. दिकत करूं लागले. सबब दोन वस्त्रें देऊन यैवज नरुत घेतला.

४० मौजे पंचाले सुलतानपूर येथील गांवचा कच्या आकाराचा दाखला पाहावयाबदल सदासिवपंत कुलकर्णी यासी अंतस्थ दिल्हे रुा १०० पैकीं सादनुक परभारा गांव निा रुपये ६० बाकी रुपये

५४

१४ जिवाजी तुकदेव याजकडे वसूल गेला मामलतीमुळें गांवगना ताा

३ मौजे दहीवाडी

२ भेटचिटी १ बकरे

३ मौजे पारेगाव खुर्द

२ भेटचिटी १ बकरे

२ मौजे धारगांव

१ भेटचिटी १ बकरे

६ मौजे पिंपले

२ भेट बकरे ४ राबता माहार

१४

५०० बालाजी माहदेव मांडवगणे यांचे कारकून वर्षासन पैकीं बरहुकूम नेमनूक

३७०६।।।। रदकर्ज विसाजी लाड कमाविसदार

९० बावा पाबलकराचे रदकर्ज पैकीं रुा ३००० तीन हजार देविले त्यास बावा पुणियांत दरसेकडा रुपये ३ तीनप्रों पडला

५२०३।-॥

बाकी गांवगना रुपये

५६०।-॥

ता

ता बेलापूर

४५॥= मौजे लोहगांव

ता देवपूर

३७	मौजे मुसलगांव
३०॥·	मौजे दहींवाडी
५१॥·	मौजे माहजनपूर
२२।=॥	मौजे शहापूर खुर्द
५१॥·	मौजे धारगांव
१४२	मौजे पंचाले सुलतानपूर
५७॥·	मौजे पारेगांव खुर्द
४८॥·	मौजे पिंपले
४३॥·	मौजे गुलापूर
३०।·	मौजे मानोरी
५१४॥=॥	

५६०।-॥

लेखांक १०६ तारीख १२-९-१७६८

श्री

राजश्री माधवराव पवार

विस्वासराव गो यांसी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुा समान सितैन मया व अलफ. खासा स्वारी बाहेर निघणार तरी तुम्ही आपले जमावासुधां जलदीनें येणें. एक घडीचा दिरंग न करणें. जाणिजे. छ २४ जिल्हेज. बहुत काय लिहिणें.

लेखन सीमा

लेखांक १०७ तारीख ८-११-१७६८

श्री

राजश्री फिरगोजी चांदगुडे कादार

जकात पा संगमनेर गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो माधवराव पवार विस्वासराव रामराम. सुा तिसा सितैन मया व आलफ. जकात मजकुरचा यैवज तुम्हांकडून येणें आहे त्यापैकीं तूर्त स्वारी खर्चास रुपये १०० शंभर पा देणें. राहिला यैवज तो तुम्ही घेऊन येणें. सदरहु शंभर रुपये पैकीं सरकारचें पालखीचे मोकासी रोजमरा रुा २५ पंचवीस देविले आहे ते देणें. पाऊणसे हुजुर पा देणें. जाणिजे. रा छ २७ जमादिलाकर.

मोर्तब सूद

लेखांक १०८ तारीख ३०-१२-१७६८

पौ सुा तिसा सितैन छ ४ साबान पौष

श्री

राजश्री माधवराव पं

वार विस्वासराव गो

छ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो। रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जावें विशेष. अंबडचे सुमोर फौजसुधां येऊन पोहचणें म्हणून पेसजी पत्र आपल्यास लिहिलें होतें त्यास प्रस्तुत श्रीमंत मनरथावरी गंगातीरीं आले आहेत. आम्हास आज्ञापत्र आलें कीं सरकारचा व भोसले यांचा बिघाड जाला तरी तुम्हीं फौजसुधां वासीमच्या घाटे वराड प्रांतीं जाणें म्हणोन त्याजवरून आम्हीं दरमजल वराड प्रांतीं जात असो. तरी तुम्हीं पत्र पावतांच सामानसुधा यावें. अत:पर दिरंग लागलिया उत्तम नसे. रा छ २० साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

लेखांक १०९ इ. स १७६८-६९

श्री

यादी व्याज साहूकार कादार वगैरे सन ११७८

रामराव चिंतामण रुा व्याज एकोत्रा प्रों ईा ता शके १६९० मार्गसीर्ष वद्य ५	हिंदुस्थानचे स्वारीचे रुपयाचें व्याज रुपये ईा ता शके १६९० मार्गसीर्ष वद्य ५
११४३०≡ रकम रुा २१५७ ईा शके ८६ श्रावण	१९६॥~ कोनेर नाईक ईा शके ८९ जेष्ट शुध १

	वा। ४ मुा माहे ५३ कचेरुो ११४३२१	एकोत्रा प्रा मुदल १००० मुा माहे १९८२० कचे रुा १९६६॥=॥ तारा-चंद ई॥ शके ८९ जेष्ट शुभ १ ता। माहे
१०५।-	रकम रुपये २००ई॥ शके८६ भाद्रपद सुध १मुा माहे ५२८२० कचे १०५३३।-	
५२॥	रकम रुपये१०० ई॥ शके८६भाद्रपद शुा ५ मुा माहे ५२॥ कचे रुपये ५२५०	
१७॥।-	रकम रुपये ३४ ई॥ शके १६८६ भाद्र-पद शुा ६ मुा माहे ५२८१४	
२५४॥=॥	रकम रुपये ५०० शके ८६ आस्विन वद्य ७ मुा माहे कचे ५०८२८ रुपये २५४६६॥≡	
४॥-	रकम रुा ९ ई॥ शके ८६आस्विन वद्य१० मुा माहे ५०८२५ कचे रुो ४५७॥	
१५७८८-॥	रुपये	

१५७।॥॒ रकम रुपये ५०० ई॥ शके ८८ जेस्ट सुध ३ मुा माहे ३१८'७ कचे रुाो १५७८३।

१३४॥ रकम रुपये ५०० ई॥ शके ८८ आस्विन वद्य ८ मुा माहे २६८२७ कचे रुाो १३४५०८=

५३॥= रकम रुपये ७०० ई॥ शके ९० जेस्ट शुा १ मुा माहे ७८२० कचे रुा ५३६७

३४५॥।≡

१२३२८॥ बाकी

लेखांक ११० तारीख १६-१०-१७६९

श्री

हिशब निा राजश्री माधवराव पवार विस्वासराव प्रां राजश्री मल्हार आपाजी पुण्यांत दरबार खर्चास जमा सन ११७९ रुाो

७०० सुप्याहून पाा भिती शके १६९१ आस्विन वद्य इटाव प्राा (बटावा प्राा ?)

१५० काा राजश्री आबाजी हरी पारनर याजवर वरात सन सबाईन बाा फडनिसाचे वरसासनाची वरात दिल्ही

८≡॥

८५०८≡॥

खर्च रुपये

२७५ बलवंतराव चिटणीस सन तिसा

२०० खासगी वरसासन

५० रामाजी बावा रुपये यादींत लिहिले होते २५
परंतु त्यानीं यादी पहिल्या काढून हिशेब
दाखवून घेतले. आरकट कंजी कोट दिल्हे
सन तिसा

२५ लिहिणार आरकट कंजी कोट सन तिसा

२७५

१२५ मुजुमदार आरकट कंजी कोट दिल्हे सन तिसा

१५० फडनिसाकडील कारकून यास सन सबैन पैकीं दिल्हे

१०० बगाजीपंत

५० आपाजीपंत गोखले

१५०

५० शेवगांवची मामलात बा। दिल्हे गु॥ सदासिवपंत मुजुमदार सन सबाईन

१५ सरकारचे चोपदार व चौकीदार

१० चोपदार

५ चौकीदार

१५

२८= खरीदी खलबता

१ सखलादी बा। मा। रामाजी नारायेण

१० जनार्दनभट अग्नहोत्री याचें घरीं राहिलो ह्मणून दक्षणा दिल्ही

३ छपरे राहण्यास घातली

२७ मसरू पा। दिल्हे

१८० पोटखर्च यकंदर दरमाहे रुपये ३० तीस प्रो ११ जेष्ट माहे ता कार्तिकअखेर

८३८८=

८ चिटणीस व मजमदार यास आरकट गंजी कोट कराने दिल्हे त्यास बटा दरसदे रुपये २ प्रा दिल्हे

८४६८=

बाकी—————————————————रुपये
४८॥

१२-१०-१७७२

लेखांक १११ तारीख ~~१७-१०-१०७१~~

श्री मार्तंड

तीर्थस्वरूप मातुश्री बाई

वडिलाचे सेवेसी

आपत्ये बालक माधवराव पवार विस्वासराव सा। दंडवत विनंती उपरी. येथील कुशल ता। आस्विन वद्य १ प्रतिपदा मुकाम इंद्रप्रस्थ जाणोन स्वकुशल लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री बापु सेटे याचे स्वारीचे कर्ज देणें त्याहि तगादा फार निकसून केला. तेव्हां राजश्री विसाजी कृष्ण बिनीवाले याजपासून मारनीलेस दिल्हे रु॥ ५००० पांच हजार. त्यास म + + + नीं देणें राजश्री विठल कृष्ण त्या + + धुपाजीपासी यैवज भरविला आहे त्या + वडिली सदरहु हे पांच हजार मा॥निलेस + न पावती पा. बहुत काय लिहिणें. हे वरात तुम्हापासी पावलियावर + अडचा महिन्यानीं यैवज देऊन पावती पा.

हे वरात हुंडीदाखल जाणावी. जरूर जरूर जाणोन वरात केली असे. मिती शके ९१ आश्विन वद्य २. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती.

लेखांक ११२ तारीख २७-१-१७७०

श्री

राजश्री लालाजी बलाळ यास

रामराम. सुा सबेन मया व अलफ. रामजी पवार नौकर सरकार याची वस्तभाव घोडा व तटु व उंट बटकी वगैरे मानजी धाभाई यानें लुटोन घेतले म्हणोन विदित जाहले. त्यास कोठ्यांत घोडी वगैरे ठिकाणीं लागले आहे. त्यास त्याची वस्तभाव घोडी उंटे व बटकी हुजूर पाठऊन देणें. छ २९ रमजान हे विनंती.

मोर्तब सुद

लेखांक ११२ (अ) तारीख २-१२-१७७०

श्री

राजश्रीयाविराजित राजमान्य

राजश्री रामचंद्र गणेश व विसाजी

कृष्ण स्वामी गोसावी यांसी

× × माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणें विशेष. राजश्री माधवराव पवार विश्वासराव यानीं विदित केलें कीं आपला लेकवला रामजी पवार

यानें आमची दोनसे घोडी घेऊन चाकरीस सिंदे याजपासी गेले. त्यास वीस पंचवीस वर्षे जाहालीं. हलीं माहदजी सिंदे याजवळ आहे. यानें घोडियाची मिलकत आम्हास द्यावी. तेही देत नाहीं. × × ची घोडीही देत नाहीं. त्यास हलीं सिंदे × × रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण याजवळ आहेत. याजकरितां रामजी पवारास ताकीद होऊन घोडी दोनसे व मिलकत देवा × × त्याजवरून हें पत्र तुम्हास लिहिलें असे. तरी तुम्ही रामजी पवारास ताकीद करून बाजत्री याची घोडी असल्यास प × × × स्वारास देवणें. जाणिजे. छ १४ साबान सुंा इहिदे सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

लेखांक ११३ इ. स. १७७०

श्री

राजश्रीयांविराजित राज
मान्य राजश्री खंडोपंत व बाजी
पंत स्वामी गोसावी यास

पोष्ये विटल सिवदेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करणें विशेष. राजश्री विसाजी गंगाधर येथें आले. भेटी होऊन तुम्हाकडे पाठविले आसेत. याचा गुंा हिसेब सुरलीत करून निघेल बाकी व साल मजकुर निमे नालबंदी यैवज करून देणें. यांची बकसीस कडी दोन राहिली आहेत ती देवणें. कापड बाकी राहिली असेल ते देणें. कनिष्टे याची असतील त्याचे सुटीचे रदबदल आहे ते ऐकून याचा आवर्जा विल्हे लावणें. यांचे जाजती स्वार पंचवीस जाजती बोजमसे याचे करवल गेले आहेत. त्याचे पंचवीस राऊत करार करून नालबंदी देणें. अडीच हजार कराराप्रमाणें

देणें. बहुत काय लिहिणें. जाजती सेभर रुपये नालबंदीस जाजती देणें. बहुत काय लिहिणें हे विनंती. सूट यांच्या पथकास न द्यावी. सबब कीं, पागेचे पथक आहे. सूट थोडीसी नांवास मात्र घालवणें. कनिष्टे असतील त्यांत निमे करार करणें. जाजती न घेणें. पागेस पैका लागतो. कबजाचे पैकीं निमे नालबंदी तैनातीची नेमून देणें. हे विनंती.

लेखांक ११४ तारीख १४-६-१७७३

श्री मार्तंड

तीर्थस्वरूप मातोश्री बाईसा

हेब वडिलाचे सेवेसी

बालके माधोराव पवार विस्वासराव चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागायेत जेष्ट वद्य १० जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असले पाहिजे विशेष. रो बापू सेटे दिमत वीरकर याचे देणे रुपये यापैकी श्रीमंत रो विसाजीपंत बिनीवाले यास देविले १४००१ चवदा हाजार एक. रो भिकाजीपंत सुभेदार कसबे रांजणगांव यांपासी पावते करून कबज घेणें आनि यैवज चलनी देणें. वरात पावलिया महेन्या एका देणें. मिती सके १६९५ जेष्ट वद्य १०. बहुत काय लिो हे विनंती.

लेखांक ११५ तारीख २३-७-१७७३

श्री

राजेश्री भिकाजीपंत सुभेदार

गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री आवडुबाई पवार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित आसिले पाा

